अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १८४ । शुक्रवार १७ एप्रिल २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com



'सहजयोग'

भाग ३०

## आत्मसाक्षात्कार : 'मी' कडून 'तू' कडे जाण्याचा मार्ग

सत्याचा शोध आणि अखंड आनंदाची प्राप्ती करण्यासाठी 'आत्म साक्षात्कार' ही पहिली पायरी आहे. जोपर्यंत आपण आपल्या अंतरंगातील आत्म्याची अनुभूती घेत नाही, तोपर्यंत बाह्य जगातील सत्य आपल्याला उमजू शकत नाही. आत्मसाक्षात्कार म्हणजे केवळ माहिती मिळवणे नव्हे, तर तो आत्म्याशी झालेला एक जिवंत संवाद आहे. सहजयोगाच्या माध्यमातून हा आत्म्याशी संबंध प्रस्थापित करणे आज अत्यंत सुलभ झाले आहे.

मात्र, केवळ आत्म्याची अनुभूती होणे पुरेसे नाही; त्या आत्म्याशी 'तादात्म्य' पावणे अधिक महत्त्वाचे आहे. हे तादात्म्य साधण्यासाठी सर्वात मोठा अडथळा ठरतो तो म्हणजे आपला 'अहंकार' किंवा 'मी पण'. जोपर्यंत आपण 'मी' पणात अडकलो आहोत, तोपर्यंत ईश्वरी तत्त्वाचा अनुभव घेता येत नाही. संत कबीरांनी बकरीचे उदाहरण देऊन हेच स्पष्ट केले आहे. जोपर्यंत बकरी 'मँ... मँ...' (मी... मी...) करते, तोपर्यंत तिला दुःख सोसावे लागते, पण जेव्हा ती 'तू ही... तू ही...' म्हणते, तेव्हाच तिला सार्थकता लाभते. आपल्या चंचल मनाचे निरीक्षण करणे हा या प्रवासाचा भाग आहे. आपले मन आपल्याला कुठे भटकवत आहे, हे ओळखून 'मी' सोडून 'तूच तो आहेस' या भावनेने आत्म्यात स्थित होणे, हाच खऱ्या आत्मसाक्षात्काराचा मार्ग आहे.

# संसदेत, विधीमंडळात ३३ टक्के महिला आरक्षण!

### ■ संसदेचे विशेष अधिवेशन सुरू ■ 'नारी शक्ती वंदन अधिनियम' केंद्रस्थानी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** महिला सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल मानल्या जाणाऱ्या महिला आरक्षण विधेयकासाठी आजपासून संसदेच्या विशेष अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. दोन दिवस चालणाऱ्या या अधिवेशनात 'नारी शक्ती वंदन अधिनियम' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विधेयकावर चर्चा होऊन त्यास मंजुरी देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून हे आरक्षण लागू करण्याचा उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

या विधेयकानुसार लोकसभा तसेच राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण देण्यात येणार आहे. यासाठी संविधानात दुरुस्ती करण्यात येणार असून, संविधान (१३१वा दुरुस्ती) विधेयकाद्वारे अनुच्छेद ८१ मध्ये बदल प्रस्तावित आहे. यासोबतच लोकसंख्येची नवी व्याख्या निश्चित करून, भविष्यातील जनगणनेच्या आधारे प्रतिनिधित्व ठरवण्याची तरतूद करण्यात आली आहे.

सध्या लोकसभेत ५४३ सदस्य आहेत. प्रस्तावित बदलांनुसार ही संख्या वाढून सुमारे ८५० पर्यंत जाण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रातील लोकसभा जागा ४८ वरून ७२ पर्यंत वाढू शकतात, असे संकेत मिळत आहेत. वाढत्या लोकसंख्येचा ताण, शहरीकरण, स्थलांतर आणि राज्यांमधील असमतोल लक्षात घेऊन जागा वाढवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जाते. या विधेयकात ईशान्येकडील राज्यांच्या प्रतिनिधित्वाचा विशेष विचार करण्यात आला आहे. अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोरम आणि नागालँडमध्ये अनुसूचित जमातींचे विद्यमान प्रतिनिधित्व कायम राहील, यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच त्रिपुरामध्येही सध्याचे प्रमाण राखण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. एकूणच, 'नारी शक्ती वंदन अधिनियम' हा महिलांच्या राजकीय सहभागाला चालना देणारा ऐतिहासिक निर्णय मानला जात असून, या विधेयकामुळे देशाच्या लोकशाही संरचनेत मोठा बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



**महिला आरक्षण लागू करण्यासाठी डिलिमिटेशन (मतदारसंघ पुनर्रचना) प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक राहणार आहे. त्यानंतर एक-तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव करण्यात येतील. या जागांचे रोटेशन केले जाईल आणि आरक्षणाची मुदत १५ वर्षांसाठी निश्चित करण्यात आली आहे.**

### राष्ट्रवादी काँग्रेसचा पाठिंबा...

महायुतीतील घटकपक्ष राष्ट्रवादी काँग्रेसकडून नारीशक्ती वंदन विधेयकाला पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून या विधेयकाचे कौतुक केले आहे. या कायद्यामुळे महिलांना सन्मान, सम नता आणि सशक्तीकरणाचा नवा अध्याय मिळाल्याचा उल्लेख त्यांनी पत्रात केला आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' आणि महिला सशक्तीकरणाच्या संकल्पनांना या विधेयकामुळे नवी गती मिळेल, असेही त्यांनी नमूद केले आहे.

### विरोधकांचा आरक्षणाला पाठिंबा पण कार्यपद्धतीवर टीका

महिला आरक्षण विधेयकाला विरोध नसून केंद्राच्या कार्यपद्धतीवर आक्षेप असल्याचे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी स्पष्ट केले. महिलांना लोकसभा व विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देण्यास विरोधकांचा पाठिंबा आहे. मात्र, लोकसभेच्या जागा ५४३ वरून ८५० करण्यासाठी होणाऱ्या मतदारसंघ फेररचनेला विरोध दर्शवण्यात आला. या प्रक्रियेमुळे आरक्षणाची अंम लबजावणी लांबू शकते, अशी भीती व्यक्त झाली. बैठकीला सुप्रिया सुळे, संजय राऊत उपस्थित होते, तर उद्धव ठाकरे यांनी ऑनलाईन सहभाग घेतला.

## अल्पवयीन मुलीवर वडिलांसह दोघांकडून अत्याचार

### मुलगी तीन महिन्यांची गर्भवती



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** नात्यांवरील विश्वास हादरवणारी आणि समाजमन सुन्न करणारी धक्कादायक घटना जामखेड तालुक्यात उघडकीस आली आहे. अवघ्या साडेतेरा वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर तिच्याच वडिलांसह एका हॉटेल चालकाने वारंवार अत्याचार केल्याची बाब समोर आली असून, पीडित मुलगी तीन महिन्यांची गर्भवती असल्याचे वैद्यकीय तपासणीत स्पष्ट झाले आहे.

मुलीचा नराधम वडील व हॉटेल चालक या दोघांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या असुन या प्रकरणी पोक्सो, बलात्कार यासह विविध कलमान्वये जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, संगमनेर तालुक्यातील परिसरात पिडीत मुलगी ही आपल्या आजी, आजोबा व वडीलांसह रहात आहे. मुलीच्या आईचे एक वर्षापूर्वीच निधन झाले आहे. मुलगी संगमनेर तालुक्यातील एका आश्रम शाळेत शिकत आहे, मात्र ऑक्टोंबर २०२५ रोजी दिवाळीच्या सुट्ट्या लागल्या असल्याने पिडीत मुलगी ही आपले आजी,आजोबा व वडील हे जामखेड तालुक्यातील एका परिसरात ऊस तोडण्यासाठी आले होते त्या ठिकाणी मुलगी देखील आली होती.

या भागातील एका हॉटेलवरील नळावर पिडीत मुलगी आपल्या आजीसह पाणी आणण्यासाठी जात असे, यावेळी हॉटेल चालकाची तीच्यावर नजर पडली. मुलीचे घरचे ऊसतोडणीसाठी बाहेर गेल्यावर हॉटेल चालकाने मुलीस जवळच असलेल्या मक्याच्या शेतात नेत तीन वेळा अत्याचार केला. तसेच हा प्रकार कोणाला सांगितला तर तुला जीवे मारुन टाकेल अशी धमकी दिली. यानंतर पिडीत मुलीचा बाप नोव्हेंबर २०२५ रोजी दिवाळी नंतर आपल्या कुटुंबासह बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील सांगवी याठिकाणी ऊस तोडणीसाठी आला होता. त्या ठिकाणी देखील पिडीत मुलीच्या नराधम बापाने आपल्या पोटच्या मुलीवर नोव्हेंबर २०२५ ते मार्च २०२६ पर्यंत अनेक वेळा अत्याचार केला. एप्रिल २०२६ मध्ये पिडीत मुलगी आपल्या संगमनेर तालुक्यातील आश्रम शाळेत वार्षीक परीक्षा देण्यासाठी दि ९ एप्रिल रोजी आली होती. यावेळी शाळेकडून मुलीच्या आजीला मुलीची मेडीकल टेस्ट करण्यास सांगितले. सदर मुलीचे संगमनेर ग्रामीण रुग्णालय या ठिकाणी मेडीकल टेस्ट केल्यानंतर पिडीत अल्पवयीन मुलगी ही तीन महीन्यांची गर्भवती असल्याची धक्कादायक माहिती समोर आली. संगमनेर पोलीसांना या घटनेची माहिती मिळताच संगमनेर पोलीसांनी पिडीत मुलीस व बापास जामखेड पोलिसांच्या ताब्यात दिले. यानंतर सपोनि वर्षा जाधव यांनी पिडीत मुलीस विश्वासात घेऊन विचारपूस केली असता जामखेड तालुक्यातील हॉटेल चालक व मुलीचा बाप अशा दोघांची नावे निष्पन्न झाली. पिडीत मुलीने जामखेड पोलीस स्टेशनला फिर्यादी दाखल केली आहे. याप्रकरणी दोन्ही आरोपींना जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या सह **(पान ४ वर)**

## महत्त्वाचे..

### चेडा', 'करणी' आणि भूतबाधेची भीती; भोंदू मांत्रिकावर गुन्हा

पुणे: खेड येथील मंदोशी परिसरात 'चेडा', 'करणी' आणि भूतबाधेची भीती दाखवत एका कुटुंबात फूट पाडण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणात किसन तळपे आणि मंगेश कारोटे या दोन कथित भगतांवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत.मि ळालेल्या माहितीनुसार, दोघांनी संगनमताने कुटुंबीयांच्या मनात भीती निर्माण केली. समोर आलेल्या ऑडिओ रेकॉर्डिंगम ध्ये घरात चेडा आणला आहे, जागरण करून तो कुटुंबात सामील करावा लागेल, अशा भ्रामक गोष्टी सांगून त्यांना मानसिकदृष्ट्या त्रस्त करण्यात आल्याचे दिसून येते. तसेच घरासमोर थडगे असल्याचा बनाव करून अघोरी विधी करण्यास भाग पाडण्याचाही प्रयत्न झाल्याचा आरोप आहे.

एकाची पोळी भाजली जाईल, बाकीच्यांची करपेल, अशा विधानांतून कुटुंबात मतभेद निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तांदूळ, प्रसाद, अंगारा यांच्या माध्यमातून दैवी शक्तीचा खोटा आभास निर्माण करण्यात आल्याचेही समोर आले आहे.

## जबर मारहाणीत वृद्धाचा मृत्यू

### मुख्य आरोपी २४ तासांत अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** तालुक्यातील पिंपळगाव उंडा येथे १२ एप्रिल २०२६ रोजी संध्याकाळी ७ वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण म ारहाणीच्या घटनेत शेतकरी विष्णू मुरलीधर म ोहळकर (वय ५०) यांचे वडील मुरलीधर दगडू मोहळकर (वय ७०) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी खर्डा पोलिसांनी २४ तासांच्या आत मुख्य आरोपीला अटक केली असून इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी रविंद्र अर्जुन शिंदे (वय ४६), कृष्णा रविंद्र शिंदे, समर्थ राजेंद्र शिंदे आणि सुवर्णा रविंद्र शिंदे (सर्व रा. पिंपळगाव उंडा) यांनी फिर्यादी विष्णू मोहळकर यांच्या घरासमोर येऊन वाद घालत शिवीगाळ व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. तू कोण आम्हाला आडवणारा? आम्ही कोठूनही शेतात येऊ, असे म्हणत आरोपींनी लाठी, लोखंडी गज तसेच लाथाबुक्यांनी हल्ला चढवला. या मारहाणीत रविंद्र शिंदे यांनी विष्णू मोहळकर व त्यांच्या मुलाला काठीने मारहाण केली, तसेच मुरलीधर मोहळकर यांच्या डोक्यात व पाठीवर गंभीर वार केले. कृष्णा शिंदे यांनी लोखंडी गजाने विष्णूंच्या कपाळावर व पाठीवर, तसेच त्यांच्या मुलाच्या मानेवर प्रहार केला. समर्थ शिंदे यांनी मुलाला लाथाबुक्यांनी मारहाण केली, तर सुवर्णा शिंदे यांनी शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. गंभीर जखमी झालेल्या मुरलीधर मोहळकर यांना उपचारासाठी अहिल्यानगर येथील मॅककेअर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र, १५ एप्रिल रोजी दुपारी ३.१५ वाजता उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी विष्णू मोहळकर यांनी १३ एप्रिल रोजी खर्डा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. सुरुवातीला मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता; मात्र मृत्यूनंतर प्राप्त झालेल्या डेथ मेमोच्या आधारे भारतीय न्याय संहिता कलम १०३ (हत्या)सह इतर कलमांनुसार गुन्हा क्रमांक ५१/२०२६ नोंदविण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तपासी अधिकारी स.पो.नि. उज्वलसिंह राजपूत यांनी दोन स्वतंत्र पथके तयार करून आरोपींचा शोध सुरू केला. गुन्हा दाखल होताच मुख्य आरोपी रविंद्र शिंदे याला २४ तासांत अटक करण्यात आली असून उर्वरित तिघांचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कुलबुर्गे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीणचंद्र लोखंडे यांच्या म ार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत सफौ रईस सय्यद, पोहेकॉ संभाजी शेंडे, गोकुळ इंगवले, पोकॉ शशी म्हस्के, राहुल शिंदे आणि गणेश बडे यांनी सहभाग घेतला.

## शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांचे क्षेत्रफळ वाढणार

### आधुनिक सुविधांचा समावेश



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला असून, आता शासकीय निवासस्थानांचे चटई क्षेत्रफळ वाढविण्यात येणार आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी हा निर्णय जाहीर केला.

या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांना अधिक प्रशस्त, सुसज्ज व आधुनिक घरांमध्ये राहण्याची संधी मिळणार आहे. नवीन धोरणानुसार, शासकीय निवासस्थानांची रचना सातव्या वेतन आयोग व वेतनगटांनुसार निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये टाईप-अ ते टाईप-ऋ अशा विविध प्रकारच्या घरांचा समावेश असून, वेतनश्रेणीनुसार क्षेत्रफळात वाढ करण्यात आली आहे. उच्च वेतनगटातील अधिकाऱ्यांसाठी कमाल २४० चौरस मीटरपर्यंत, तर निम्न वेतनगटातील कर्मचाऱ्यांसाठी किम ान ४५ चौरस मीटरपर्यंत क्षेत्रफळ निश्चित करण्यात आले आहे. या सुधारित आराखड्यात घरातील सुविधांनाही विशेष महत्त्व देण्यात आले आहे. प्रत्येक घरात बैठक खोली, भोजनकक्ष, शयनकक्ष, स्वयंपाकघर, स्वच्छतागृह व बाल्कनी यांचा समावेश अनिवार्य करण्यात आला आहे. काही निवासस्थानांमध्ये अधिकाऱ्यांच्या गरजेनुसार कार्यालयीन कक्ष, अभ्यासिका तसेच सेवक कक्षाचीही तरतूद करण्यात येणार आहे. त्यामुळे कामकाज आणि वैयक्तिक जीवन यामध्ये संतुलन साधण्यास मदत **(पान ४ वर)**

## खोटा शेतमाल दाखवून बँकेची २३ कोटी ३३ लाखांची फसवणूक

### १७७ जणांच्या नावे कर्ज : पाच वर्षांपासून सुरू होता कर्ज घोटाळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जालना :** जालन्यातील मोतीराम अग्रवाल मर्चंड कोऑपरेटिव्ह बँकेत २३ कोटी ३३ लाखांची फसवणूक झाली आहे. अस्तित्वात नसलेला शेतीमाल दाखवून आरोपीने १७७ जणांच्या नावे २३ कोटी ३३ लाखांचे कर्ज उचलले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी रायचंद कुरंगळ नावाच्या व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. न्यायालयानं आठ दिवसांची पोलीस कोठडी सुवली आहे.



जालन्यातील मोतीराम अग्रवाल मर्चंड कोऑपरेटिव्ह बँकेत १७७ जणांच्या नावाने तब्बल २३ कोटी २३ लक्ष रुपयाचे बनावट कर्ज काढून बँकेची फसणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. वेअर हाउसमध्ये अस्तित्वात नसलेल्या माल दाखवून आरोपीने १७७ जणांच्या नावावर हे कर्ज घेतल्याचा प्रकार समोर आलाय, या प्रकरणी बँक मॅनेजरच्या तक्रारीवरून आरोपी रायचंद कुरंगळ नावाच्या व्यक्तीला **(पान ४ वर)**

## 'सध्याच्या ५४३ जागांमध्येच ३३ टक्के महिला आरक्षण द्या'

### प्रियांका गांधींची लोकसभेत आग्रही मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** महिला आरक्षणाचा विषय हा देशातील प्रत्येक महिलेच्या हृदयाच्या जवळचा आहे. जर सरकारची नियत साफ असेल, तर म हिला आरक्षणासाठी सीमांकनाची वाट पाहण्याची गरज नाही. लोकसभेच्या सध्याच्या ५४३ जागांमध्येच तात्काळ ३३ टक्के आरक्षण लागू करावे, अशी आग्रही मागणी काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी आज लोकसभेत केली. संविधानाच्या १३१ व्या दुरुस्ती विधेयकावरील चर्चेदरम्यान त्या बोलत होत्या.

पंतप्रधानांनी महिला आरक्षणाच्या विलंबावरून केलेल्या टीकेला उत्तर देताना प्रियांका गांधी म्हणाल्या की, याची पार्श्वभूमी सत्ताधाऱ्यांना कदाचित आवडणार नाही.



महिलांना समान राजकीय अधिकार देण्याची सुरुवात मोतीलाल नेहरू यांनी १९२८ च्या अहवालात केली होती. त्यानंतर १९३१ च्या कराची अधिवेशनात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली या प्रस्तावाला मंजुरी मिळाली. याच निर्णयाम ुळे भारतीय महिलांना स्वातंत्र्याच्या पहिल्या दिवसापासून मतदानाचा अधिकार मिळाला, ज्यासाठी अमेरिकेतील महिलांना १५० वर्षे संघर्ष करावा लागला होता. **(पान ४ वर)**

## उन्हाच्या चटक्यांनी बदलली लग्नाची 'घडी'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** चकाकणारे कपडे, ढोल-ताशांचा गजरात उन्हात नाचणारी तरुणाई आणि भर दुपारी १२ वाजताचा गोरज मुहूर्त... हे चित्र आता भूतकाळात जमा होण्याची वेळ आली आहे. वाढत्या तापमानाचा आणि हवामान बदलाचा थेट फटका आता आपल्या संस्कृतीचा भाग असलेल्या लग्न समारंभांना बसू लागला असून, लग्नाच्या वेळा बदलण्याची आग्रही मागणी आरोग्य तज्ज्ञांकडून होत आहे. राज्याच्या साथरोग विभागाचे माजी सर्वेक्षण अधिकारी डॉ. प्रदीप आवटे यांनी मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात मानवी जीवनशैलीतील या बदलावर प्रकाश टाकला. आपल्याकडे उन्हाळा आणि लग्नसराई एकाच वेळी येते. ग्रामीण भागात आजही भर दुपारी लग्नाचे मुहूर्त असतात. भर उन्हात जेवण केल्यानंतर नाचल्याम ुळे अगदी २५ वर्षांच्या तरुणांचा मृत्यू झाल्याच्या धक्कादायक घटना घडल्या आहेत, असे डॉ. आवटे यांनी नमूद केले. त्यामुळेच आता उन्हाळ्यातील लग्नाचे मुहूर्त दुपारऐवजी सायंकाळी ठेवणे, ही चैन नसून काळाची गरज बनली आहे. केवळ लग्नच नव्हे, तर शहरांमधील सार्वजनिक ठिकाणांच्या वापराबाबतही पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. सध्या दुपारच्या वेळी उद्याने बंद ठेवली जातात. मात्र, उन्हाच्या लाटेपासून सर्वसामान्यांना संरक्षण मिळावे यासाठी उन्हाळ्यात उद्याने आणि धार्मिक स्थळे दुपारीही खुली ठेवावीत, जेणेकरून वाटसरूंना तिथे आसरा घेता येईल, असे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

### दुपारचे मुहूर्त आता सायंकाळी?

#### जीवनशैलीत बदलाचे संकेत

हवामान बदलामुळे केवळ निसर्गच बदलत नाही, तर माणसाचा आहार, मानसिक आरोग्य आणि सामाजिक सोहळ्यांवरही त्याचे सावट आहे. वाढत्या उष्णतेमुळे होणारा मानसिक त्रास आणि आरोग्यावरील परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी आता अधिक सजग होण्याची गरज आहे. एकूणच, निसर्गाच्या वाढत्या कोपामुळे मानवी जीवनशैलीला नवी 'घडी' बसवणे अनिवार्य झाले आहे.

## संपादकीय

# संगीताचा उन्माद की मृत्यूचा सापळा?

मुंबईच्या गोरेगाव येथील एका सांगीतिक कार्यक्रमात (कॉन्सर्टमध्ये) ड्रग्जच्या अतिसेवनामुळे दोन तरुण विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू ही केवळ एक 'दुर्दैवी घटना' नाही, तर ती आपल्या समाजव्यवस्थेच्या सडत चाललेल्या मानसिकतेचे आणि खिळखिळ्या झालेल्या प्रशासन व्यवस्थेचे विदारक दर्शन आहे. दोन हसत्या-खेळत्या तरुणांचा असा अकाली अंत होणे हे समाजमन सुन्न करणारे आहे. मात्र, या घटनेची गांभीर्याने दखल घेण्याऐवजी जर आपण याकडे पाठ फिरवली किंवा याला एक अपवादात्मक घटना मानून सोडून दिले, तर ते येणाऱ्या पिढीसाठी अत्यंत घातक ठरेल. संगीताचा उत्सव हा आनंदाचा, निर्मितीचा आणि चैतन्याचा असतो; परंतु आज तो नशेच्या धुंदीत बुडून जीवघेणा ठरू लागला आहे.

भारतीय संस्कृतीत संगीताला 'साधना' मानले गेले आहे. संगीत हे केवळ करमणुकीचे साधन नसून ते अंतर्मुख करणारे, आत्म्याला साद घालणारे माध्यम आहे. प्राचीन काळापासून संगीताने रसिकांना 'बेधुंद' केले आहे, पण ती नशा सात्त्विक असते. ती मनाला स्थिर करणारी आणि जगण्याला नवा अर्थ देणारी असते. त्या नशेला कोणत्याही रासायनिक उत्तेजक पदार्थांची (ड्रग्ज) गरज भासत नाही. मात्र, आजच्या आधुनिक 'कॉन्सर्ट' संस्कृतीने संगीताचा हा मूळ गाभाच हरवून टाकला आहे.

आजच्या सांगीतिक कार्यक्रमांमध्ये संगीतापेक्षा अधिक महत्त्व हे तिथल्या रोषणाईला, अंगावर येणाऱ्या मोठ्या आवाजाला (गोंगाटाला) आणि त्या वातावरणात निर्माण केल्या जाणाऱ्या कृत्रिम उन्मादाला दिले जात आहे. या उन्मादाच्या नावाखाली ड्रग्ज आणि अमली पदार्थांचा व्यवसाय करणारी एक समांतर संस्कृती तिथे फोफावत आहे. संगीताच्या नावाखाली तरुणाईला नशेच्या जाळ्यात ओढण्याचे हे एक पद्धतशीर षडयंत्र आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

गोरेगाव येथील घटनेत सर्व नियम धाब्यावर बसवण्यात आले होते. नियमानुसार, अशा मोठ्या सार्वजनिक कार्यक्रमात प्रवेशद्वारावर कडक सुरक्षा तपासणी होणे बंधनकारक असते. मग तरीही प्रतिबंधित ड्रग्ज आत पोहोचले कसे? वयोमर्यादेचे उल्लंघन करून तिथे मद्यपुरवठा कसा झाला? वेळेची मर्यादा कोणी आणि का ओलांडली? या प्रश्नांची उत्तरे शोधली तर एक भयाण वास्तव समोर येते. आयोजकांना केवळ नफ्याशी देणेघेणे आहे; त्यांना तिथे येणाऱ्या तरुणांच्या जिवाची कोणतीही पर्वा नाही.

सर्वात संतापजनक बाब म्हणजे, नियमन करणाऱ्या सरकारी यंत्रणाही यावेळी जणू सुस्त होत्या. जेव्हा मोठ्या प्रमाणात तरुण मुले एकत्र येतात, तेव्हा तिथे विशेष लक्ष देण्याची जबाबदारी पोलिसांची आणि उत्पादन शुल्क विभागाची असते. मात्र, यंत्रणांचे हे दुर्लक्ष जाणीवपूर्वक होते की काय, अशी शंका येते. जेव्हा पैसे आणि अधिकारांची नशा चढते, तेव्हा कर्तव्य विसरले जाते आणि त्याचे परिणाम गोरेगावासारख्या घटनांतून समोर येतात.

या समस्येचे मूळ हे केवळ कायद्याच्या अंमलबजावणीत नाही, तर ते समाज म्हणून आपल्या बदललेल्या जीवनशैलीत आहे. आज तरुणाईसाठी आनंदाची व्याख्या बदलली आहे. आनंद हा आता शांत, सखोल आणि दीर्घकाळ टिकणारा अनुभव राहिलेला नाही. तो आता 'इन्स्टंट' झाला आहे. सोशल मीडियाच्या युगात प्रत्येक गोष्ट त्वरित हवी असते. हा क्षणिक आणि तीव्र आनंद मिळवण्यासाठी मग शरीरावर आणि मेंदूवर थेट परिणाम करणाऱ्या पदार्थांची मदत घेतली जाते.

सोशल मीडिया, चित्रपट आणि जाहिरातींमधून 'पार्टी संस्कृती'चे जे उदात्तीकरण केले जाते, त्यात नशा म्हणजे 'कूल' असणे, असे भासवले जाते. नामांकित महाविद्यालयांत शिकणारे, चांगले करिअर डोळ्यांसमोर असलेले तरुण या मृगजळामागे धावत आहेत. हे विद्यार्थी अशिक्षित नाहीत, त्यांना माहितीचा अभाव नाही; तर त्यांच्यात नैतिक मूल्ये आणि सामाजिक जाणिवेचा अभाव आहे. स्वतःच्या अस्तित्वातील पोकळी भरून काढण्यासाठी ते ड्रग्जच्या पळवाटेचा आधार घेत आहेत.

गोरेगावची घटना ही हिमनगाचे केवळ एक टोक आहे. अमली पदार्थांच्या तस्करीचे जाळे किती खोलवर रुजले आहे, हे नुकत्याच घडलेल्या काही घटनांवरून स्पष्ट होते. रेल्वेतून सव्वाचार कोटींचे कोकेन घेऊन प्रवास करणारी महिला पकडली जाणे किंवा पंजाबमधून महाराष्ट्रात येणारे ड्रग्जचे साठे सापडणे, हे या समस्येची व्याप्ती किती प्रचंड आहे हे दर्शवते. हे केवळ स्थानिक पातळीवरचे गुन्हे नाहीत, तर यामागे देशविघातक शक्तींचा हात असण्याची शक्यता नाकारता येत नाही. ड्रग्जचा पैसा हा दहशतवादासाठी वापरला जातो, हे आता लपून राहिलेले नाही. त्यामुळेच हे जाळे नष्ट करण्यासाठी केवळ पोलीस कारवाई पुरेशी नाही, तर केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये प्रभावी समन्वय आणि प्रबळ इच्छाशक्तीची गरज आहे.

केवळ सरकारला दोष देऊन समाज आपली जबाबदारी झटकू शकत नाही. आपल्या पाल्यांच्या आयुष्यात काय चालले आहे, त्यांचे मित्र कोण आहेत, ते आपला फावला वेळ कुठे घालवतात, याकडे पालकांचे लक्ष असणे अनिवार्य आहे. मुलांवर केवळ यशाचा आणि स्पर्धेचा दबाव टाकण्याऐवजी, त्यांना जीवनातील खऱ्या आनंदाची ओळख करून देणे ही पालकांची मोठी जबाबदारी आहे.

आजची पिढी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगाशी जोडलेली असली, तरी ती स्वतःशी आणि कुटुंबाशी तुटलेली आहे. या एकाकीपणामधूनच मुले नशेच्या आहारी जातात. समृद्ध जीवन संस्कृतीची ओळख करून देणे, वाचन, मैदानी खेळ आणि कलांची आवड जोपासणे या गोष्टी आता घराघरातून होणे गरजेचे आहे.

गोरेगावची घटना ही संपूर्ण समाजासाठी धोक्याची घंटा आहे. अमली पदार्थ मुक्त समाजासाठी आपल्याला बहुस्तरीय लढाई लढावी लागेल. ड्रग्ज पुरवठा करणारी साखळी मुळासकट उखडून टाकण्यासाठी तपास यंत्रणांनी तळागाळापर्यंत पोहोचले पाहिजे. अशा सांगीतिक कार्यक्रमांच्या आयोजकांवर कडक निर्बंध हवेत. कोणत्याही नियमाचे उल्लंघन झाल्यास आयोजकांचा परवाना कायमचा रद्द व्हायला हवा. शाळा-महाविद्यालयांमध्ये केवळ ड्रग्जच्या दुष्परिणामांची माहिती देऊन चालणार नाही, तर मानसिक आरोग्य आणि जीवन कौशल्यांवर भर दिला पाहिजे. ड्रग्ज विक्रीबाबतची माहिती देणाऱ्या नागरिकांना संरक्षण आणि प्रोत्साहन दिले पाहिजे.

नफ्याच्या आणि उन्मादाच्या मोहात तरुणाईच्या जिवाशी खेळण्याचा हा खेळ आता थांबला पाहिजे. संगीताची मैफल ही आनंदाची उधळण असायला हवी, कोणाची अंत्ययात्रा नव्हे. जर आपण आज ही परिस्थिती बदलली नाही, तर उद्याचे भवितव्य अंधकारमय असेल. गोरेगावातील त्या दोन विद्यार्थ्यांचा बळी हा व्यर्थ जाऊ नये, हीच अपेक्षा आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा १३५ वा जयंती सोहळा बेलापूर ग्रामपंचायत तसेच ग्रामस्थांकडून उत्साहात संपन्न झाला. बेलापूर ग्रामपंचायत येथे ग्रामस्थांच्यावतीने डा.आंबेडकर यांचे प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. तसेच छ.शिवाजी महाराज चौकात डॉ.आंबेडकर याचा मुख्य जयंती सोहळा संपन्न झाला.



गावातील विविध मंडळांकडूनही डा.आंबेडकर जयंती जल्लोषात साजरी करण्यात आली. आंबेडकरवादी तरुणाईचा याप्रसंगी उत्साह बघायला मिळाला. दिवसभर भिमगीते व डा.आंबेडकर यांचा जयघोष होता. गावातील विविध मंडळांनी स्नेहभोजनाचे आयोजन केले.या सोहळ्यात ग्रामपंचायत पदाधिकारी .विविध संस्थांचे पदाधिकारी,सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आदिंची उपस्थिती होती.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त मिरवणूक, शिवगीते व भीमगितांनी परिसर दुमदुमला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती नेवासा तालुका यांच्यावतीने बुधवारी दि.१५ एप्रिल रोजी सायंकाळी काढण्यात आलेल्या मिरवणूकीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी डिजेवर लावलेल्या शिवगीते व भीमगितांनी परिसर दुमदुमला होता तर शिवकालीन मर्दानी खेळांचे मुलामुलींनी केलेले प्रात्यक्षिके मिरवणुकीचे खास आकर्षण ठरले होते.

नेवासा येथील मळगंगादेवी मंदिराच्या समोरील प्रांगणापासून सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला.पोलीस निरीक्षक महेश पाटील,डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे मार्गदर्शक ॲड. संजय सुखदान व शहराच्या उपनगराध्यक्षा शालिनीताई सुखदान, बालेंद्र पोतदार, प्रा. सुनील गर्जे, ॲड. सादिक शिलेदार, रवी भालेराव, राजेंद्र वाघमारे, मुन्ना शेख यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी निघालेल्या मिरवणुकीत मास्टर सुरेशकुमार लव्हाटे यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील दांडपट्टा फिरवणे आदी शिवमर्दानी खेळांचे प्रात्यक्षिके बाल मावळयांनी सादर करून उपस्थितांना आकर्षित केले.निघालेल्या मिरवणुकीमध्ये सर्व जातीधर्माचे लोक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सदर मिरवणूकीत नगरसेवक जितेंद्र कु-हे, नगरसेवक संभाजी धोत्रे,नगरसेवक स्वप्नील मापारी,दिनेश व्यवहारे,जालिंदर गवळी,राजू काळे,अनिल शिंदे,डॉ. राहुल चव्हाण,असिफभाई पठाण,अजय त्रिभुवन सिद्धार्थ सुखदान,पृथ्वी सुखदान यांच्यासह सर्वधर्मीय बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. चौकाचौकात फटाक्यांची आतषबाजीने व तोफांच्या सलामीने मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले.

नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चौकाचौकात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.व्यापाऱ्यांनी देखील आपली दुकाने उघडी ठेऊन मिरवणूकीतील रथामध्ये ठेवलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. मिरवणूक समारोप प्रसंगी नगरपंचायत चौकात झालेले शोभेचे दारुकाम सर्वांचे डोळे दिपवणारे ठरले. मिरवणूक यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे मार्गदर्शक ॲड. संजय सुखदान यांनी उपस्थितांचे आभार मानले.





# कोल्हे कारखान्यात श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी भक्तिभावात साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर यंदाही श्री स्वामी समर्थांची पुण्यतिथी भक्तिभावाने साजरी करण्यात आली. अध्यक्ष विवेक कोल्हे यांच्या हस्ते आरती व धार्मिक विधी पार पडले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपाध्यक्ष ज्ञानेश्वर परजणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. मोरेदादा यांच्या संकल्पनेतून २००६ पासून सुरू झालेल्या स्वामी समर्थ गुरूचरित्र पारायण सोहळ्याचे यंदा विसावे वर्ष पूर्ण झाले. यावेळी ९३ पारायणार्थी सहभागी झाले होते.



वर्षातून दोन वेळा पार पडणाऱ्या या उपक्रमांत आतापर्यंत ३९ पारायणे झाली असून युवक, युवती व महिलांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

यावेळी विवेक कोल्हे यांनी सांगितले की, संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे व माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांच्या मार्गदर्शनातून अध्यात्मिक संस्कारांची परंपरा जपली जात आहे. कारखाना परिसरात विविध धार्मिक उपक्रम सातत्याने राबविले जात असून लवकरच प्रशस्त धार्मिक सभागृह उभारण्यात येणार आहे.कार्यक्रमास संचालक, अधिकारी, कामगार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन चंद्रकांत जाधव यांनी केले तर आभार वसंत थोरात यांनी मानले. यावेळी महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.

## गोधडीमुळे श्रीरामपूरचा पाणीपुरवठा विस्कळीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावातील मोटारीत गोधडी अडकल्यामुळे पाईपलाईन तुंबल्याने गुरुवारी सकाळी शहरातील अनेक भागांत पाणीपुरवठा विस्कळीत झाला. या घटनेमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी रात्री सुमारे दहाच्या सुमारास कालव्यातून तलावात आलेली गोधडी मोटारीच्या प्लेटमध्ये अडकल्याने मोटार जाम झाली. परिणामी पाण्याच्या टाक्यांमध्ये पाणी पोहोचू शकले नाही. सकाळी कर्मचाऱ्यांनी मोटार स्वच्छ केल्यानंतर पाणी भरण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यामुळे सकाळचा पाणीपुरवठा खंडित झाला असून दुपारनंतर काही भागांत पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला. घटनेची माहिती मिळताच नगराध्यक्ष करण ससाणे यांनी तलावावर भेट देऊन पाहणी केली व पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारल्याची माहिती आहे. दरम्यान, कालव्याच्या तोंडावर जाळी नसल्याने कचरा थेट तलावात येत असल्याचे समोर आले आहे. तलावात पाणी कमी असल्याने घाण पाणी थेट सोडण्यात आल्याने कचऱ्याचे प्रमाण वाढले. त्यामुळे मोटारीत गोधडी अडकून ही समस्या निर्माण झाली. पाणीपुरवठा विभागाच्या हलगर्जीपणामुळे ही परिस्थिती उद्भवल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, योग्य उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# उंबरी बाळापूर येथे रविवारी संयुक्त जयंती महोत्सव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर येथे रविवार, दिनांक १९ एप्रिल रोजी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी डॉ. आंबेडकर आणि वीर एकलव्य स्मारकाचा भूमिपूजन सोहळा पार पडणार आहे. या निमित्ताने दिवसभर विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर होणार आहेत.

कार्यक्रमाची सुरुवात दुपारी ४ वाजता अकोले तालुक्यातील सुप्रसिध्द आदिवासी नृत्य पथकाच्या सादरीकरणाने होईल. त्यानंतर सायंकाळी ६ ते ८ या वेळेत महामानवांच्या प्रतिमेची सवाद्य भव्य मिरवणूक काढली जाणार असून जनसमुदायासाठी स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

दरम्यान,महोत्सवाचा समारोप रात्री ९ वाजता सुप्रसिध्द गायक अविनाश कदम यांच्या 'भीम गीतांच्या' बहारदार कार्यक्रमाने होणार आहे. या संयुक्त जयंती उत्सव सोहळ्याला उंबरी बाळापूरसह पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयुक्त जयंती महोत्सव समितीने केले आहे.



# महाराजस्व समाधान शिबिरातून ३,६०० प्रकरणे मार्गी : प्रांताधिकारी उंडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

संगमनेर : राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरा' अंतर्गत संगमनेर तालुक्यात पहिल्या टप्प्यात सुमारे ३ हजार ५९१ प्रकरणांचा निपटारा करण्यात आल्याची माहिती प्रांताधिकारी अरुण उंडे यांनी दिली.

या शिबिरात डिजिटल सातबारा वाटप, निकाली फेरफार, सातबारा दुरुस्ती अर्ज, डिजिटल ८अ, विविध दाखले तसेच एक खिडकी योजनेअंतर्गत अर्जांचा समावेश होता. नागरिकांची कामे गावातच तात्काळ निकाली काढण्यासाठी महसूल विभागाने हा उपक्रम राबविला.

आमदार अमोल खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली धांदरफळ खुर्द, घुलेवाडी, घारगाव व निमोण परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांना विद्यार्थी, महिला व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आवश्यक कागदपत्रे जागेवरच उपलब्ध झाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.

या उपक्रमांतर्गत ५८६ फेरफार, १५७ दुरुस्ती अर्ज, १४३३ डिजिटल सातबारा, ७०५ डिजिटल ८ अ, ५४९ विविध दाखले व १६१ एक खिडकी अर्ज निकाली काढण्यात आले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी तहसीलदार धीरज मांजरे, नायब तहसीलदार मार्तंड माळवे, तसेच तलाठी व मंडळ अधिकारी यांनी विशेष प्रयत्न केले.

# कोपरगाव तालुक्यात जिओची सेवा कोलमडली, ग्राहकांचा संताप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी, सुरेगाव परिसरात गेल्या चार ते पाच दिवसांपासून रिलायन्स जिओची मोबाईल सेवा पूर्णपणे विस्कळीत झाली असल्याने हजारो जिओ ग्राहकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. कॉल लागत नसल्याने जिओ ग्राहकांचा मोबाईल वरून संपर्क होत नसून इंटरनेटचा वेगही अतिशय मंदावल्यामुळे युपीआय पेमेंट सेवाही पूर्ण होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

सध्याच्या डिजिटल युगात मोबाईल आणि इंटरनेट हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. मोफत सेवेचे आमिष दाखवून लाखो मोबाईल धारकांना आपल्या जाळ्यात ओढणारी रिलायन्स जिओ कंपनी इंटरनेट सेवा देत आहे. ही कंपनी चांगल्या दर्जाची सेवा देत असल्यामुळे या कंपनीचा मोठा ग्राहक वर्ग आहे. मात्र चांगल्या सेवेची सवय लागलेल्या लाखो ग्राहकांना दोन दिवसांपासून विस्कळीत झालेल्या इंटरनेट सेवेचा चांगलाच फटका बसला आहे. जिओच्या सीमकार्डवरून कॉल न लागणे, नेटवर्क नसणे अशा असंख्य अडचणी येत आहेत. कोळपेवाडी, सुरेगाव परिसरात नेटवर्कची समस्या मोठ्या प्रमाणात वाढली असून अनेक वेळा मोबाईलला नेटवर्क दिसत असूनही प्रत्यक्षात कॉल मात्र लागत नाही. संपर्कासाठी पूर्णपणे मोबाईलवर अवलंबून असल्यामुळे एखाद्या संकटाच्या वेळी किंवा अचानक उद्भवणाऱ्या प्रसंगावेळी जर संपर्क होवू शकला नाही तर काय करायचे असा प्रश्न नागरिकांना विस्कळीत झालेल्या इंटरनेट सेवेमुळे पडला आहे.

इंटरनेटचा वेग संथ असल्याने हे व्यवहार पूर्ण होत नसून खरेदीसाठी गेलेल्या नागरीकांची चांगलीच पंचाईत होत असून याचा थेट परिणाम बाजार पेठेतील खरेदी विक्रीवर झाला आहे. वर्क फ्रॉम होम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तर नेटवर्क अभावी आपली नोकरी टिकवणे अवघड झाले आहे. जिओ कंपनीने त्यांचे रिचार्जचे दर अफलातून वाढवले असतांना देखील ग्राहकांची जिवोला पसंती आहे मात्र त्या तुलनेत उच्च दर्जाची सेवा मिळत नसल्याने जिओ ग्राहकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आजच्या समाजाला दिशादर्शक : भारत गीते

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले कार्य आणि त्यांनी दिलेले संविधान आजच्या समाजासाठी दिशादर्शक ठरत आहे, असे प्रतिपादन भाजप जिल्हा सरचिटणीस भारतराव गीते यांनी केले. पिंपरी लौकी अजमपुर येथे डॉ. आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन सभेत ते बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेसह छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, गौतम बुद्ध, महाराणी अहिल्यादेवी व संत भगवान बाबा यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली.

गीते यांनी सांगितले की, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन डॉ. आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना न्याय मिळवून दिला. जातीय भेद दूर करून समतेचा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या शिका, संघटित व्हा या विचारांनी अनेकांनी उच्च शिक्षण घेऊन देशाच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलला आहे.

# अस्थिविकार तपासणी शिबिरास उस्फुर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पोहेगांव :** कोपरगावमध्ये नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असलेली गोदामाई प्रतिष्ठान ट्रस्ट आणि पुणे येथील प्रसिद्ध संचेती हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमानाने संचेती हॉस्पिटल येथील तज्ञ डॉक्टर्स डरा मंगळवार दि १४ एप्रिल रोजी आयोजित मोफत अस्थिविकार तपासणी शिबिरात २०० हुन अधिकच्या अस्थि विकारग्रस्तांनी लाभ घेतला.

कोपरगाव शहरातील नामदेवराव परजणे पाटील लॉ कॉलेज येथे आयोजित केलेल्या शिबिराचे उद्घाटन क्रेडाईचे अध्यक्ष राजेश ठोळे यांच्या अध्यक्षतेखाली वैद्यकीय शैक्षणिक औषध विभाग मंत्रालय महाराष्ट्र शासन मुंबईचे उपसचिव संदीप ढाकणे व मराठी सिने अभिनेते चिन्मय उदगीरकर यांच्या शुभहस्ते झाले.

याप्रसंगी कोपरगाव तालुका विद्यार्थी सहाय्यक समितीचे डॉ हिरालाल महानुभाव, संचेती हॉस्पिटल पुणे जनरल मॅनेजर डॉ राहुल चोबे, कोपरगाव शहर पोलीस उपनिरीक्षक दीपक रोठे, संदीप सोने, मंत्रालय कक्ष अधिकारी जालिंदर आव्हाड, सोमैय्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय ठाणगे, नगरसेवक रवींद्र कथले, सामाजिक कार्यकर्ते विनोद राक्षे, डॉ चंद्रशेखर आव्हाड, प्रदीप गुरुली आदींच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

या शिबिरात बी एम डी टेस्ट सांधेदुखी, संधिवात, सांधे प्रत्यारोपण,कंबरदुखी, हाता पायांना मुंग्या येणे,फ्रोजन शोल्डर, मणक्याचे जुने आजार, डायबेटिक निरोपॅथी, सायटिका पेन, लिंगामेट इन्जूरी, टेनिस एलबो तसेच रिप्लेसमेंट नंतरचे उपचार या अस्थिरोग विकार ग्रस्तांची तपासणी केली.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

दखल

## महात्मा फुलेंनी समाजाला जागृत केले : कुदळे




**श्रीरामपूर** : क्रांतिसूर्य महात्मा फुले यांनी महिलांच्या शिक्षणासाठी शैक्षणिक दालने सुरू करून समाजात जागृती घडवून आणली. त्यांच्या कार्यामुळे आज स्त्रिया सर्व क्षेत्रात प्रगती करत असून बहुजन समाज सशक्त झाला आहे, असे प्रतिपादन सावता प्रतिष्ठानचे अध्यक्ष व उद्योजक विजयराव कुदळे यांनी केले. महात्मा फुले जयंतीनिमित्त सावता प्रतिष्ठानतर्फे छत्रपती शिवाजी पथ, सावता महाराज रोड येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कुदळे यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास जिल्हा काँग्रेस अध्यक्ष सचिन गुजर, दीपक गिरमे, सुरेंद्रनाना गिरमे, नगरसेविका आशा रासकर, माजी नगरसेवक दत्तात्रय साबळे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. फुलेंच्या कार्याचे अनुकरण करून तरुणांनी समाज विकासासाठी पुढे यावे, असे आवाहन कुदळे यांनी केले.

## श्री स्वामी समर्थ महाराजांची पुण्यतिथीनिमित्त गुरुचरित्र पारायण

**नेवासा** : येथील दुर्गादेवी मंदिरात असलेल्या स्वामी समर्थ महाराज केंद्रातील सेवेकऱ्यांच्या वतीने श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने गुरुचरित्र पारायण सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी आरती करून स्वामींची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. नेवासा येथील दुर्गादेवी मंदिरात असलेल्या श्री स्वामी समर्थ केंद्रामध्ये पुण्यतिथी निमित्त सप्ताहभर गुरुचरित्र ग्रंथाचे सेवेकऱ्यांनी पारायण केले.नित्यनेमाने स्वामींची प्रतिमा पूजन नैवैद्य अर्पण करून आरती करण्यात आली. गुरुचरित्र पारायणाला महिला भगिनी सेवेकऱ्यांची संख्या लक्षणीय होती. पुण्यतिथी निमित्ताने स्वामींची प्रतिमा पुष्पांनी सजविण्यात आली होती.यावेळी नेवासा शहरातील भाविकांनी स्वामींच्या दर्शनासाठी दुर्गादेवी मंदिरात गर्दी केली होती.

## डेरेवाडी येथे चाकूरबाई माता देवीची यात्रा उत्साहात

**संगमनेर** : तालुक्यातील धांदरफळ गाव अंतर्गत येणाऱ्या डेरेवाडी येथे चाकूरबाई माता देवीची यात्रा विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते चाकूरमाता देवीची महाआरती करण्यात आली. गावातून वाजत-गाजत मानाच्या काठीची मिरवणूक देवीच्या मंदिरा कडे नेली.यात्रा उत्सवानिमित्त रंगीत संगीत आखाडीचे आयोजन करण्यात आले होते. या आखाडीत गावातील तरुणांनी गणपती, राम, लक्ष्मण, वाळीव, सुब्रीव तसेच वेताळबाबा यांचे आकर्षक देखावे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यात्रा उत्सवामुळे ग्रामस्थांमध्ये एकोपा व आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. यात्रेच्या निमित्ताने ग्रामस्थ संख्येने भाविकांनी उपस्थित राहून देवीचे दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेत यात्रा यशस्वी करण्यासाठी पुंजा डेरे, कमलेश डेरे, भाऊसाहेब डेरे, सोमनाथ डेरे, सागर डेरे, जयराम डेरे, गणेश डेरे, महेश बोऱ्हाडे, जालिंदर डेरे, मंगेश डेरे, अशोक बोऱ्हाडे, प्रवीण डेरे, विनोद डेरे, प्रल्हाद डेरे, पोपट डेरे त्यांच्या ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

## शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या कोपरगाव तालुका प्रमुखपदी वैभव चव्हाण



**पोहेगाव** : हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने तसेच शिवसेनेचे मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या आदेशाने आणि मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या कोपरगाव तालुका प्रमुखपदी वैभव चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वैभव चव्हाण यांनी शिवसेना पक्षाचे काम करत असताना गरजू व सर्वसामान्य रुग्णांना वेळोवेळी मदत केली आहे. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत शिवसेना जिल्हाप्रमुख नितीनराव औताडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली. शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून गोरगरीब व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना धर्मदाय रुग्णालयांत दहा टक्के राखीव खाटा उपलब्ध करून देणे, निकषात बसणाऱ्या रुग्णांवर मोफत अथवा सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया करून देणे तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत नोंदणीकृत रुग्णालयांमध्ये गरजू रुग्णांना मोफत उपचार मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार असल्याचे चव्हाण यांनी सांगितले. या निवडीबद्दल त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## गौतम पब्लिक स्कूलमध्ये प्रवेश प्रक्रिया उत्साहात

**कोळपेवाडी** : कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित गौतम पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता १ ली ते ८ वीच्या प्रवेश प्रक्रियेला मंगळवार (दि.१४) रोजी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गुणवत्तापूर्ण शिक्षण व शिस्तीमुळे राज्यभर नावलौकिक असलेल्या या विद्यालयात प्रवेशासाठी पालकांनी विद्यार्थ्यांसह मोठी गर्दी केली होती. दरवर्षीप्रमाणे यंदाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून एकदिवसीय प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण होणे अनिवार्य असून, पात्र विद्यार्थ्यांनाच संधी देण्यात आली. परीक्षा सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासनाने विशेष व्यवस्था केली होती. निकाल तत्काळ जाहीर करून कागदपत्रांची पडताळणी करून प्रवेश निश्चित करण्यात आले. यानंतर नूतन विद्यार्थी व पालकांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम झाला. प्राचार्य नूर शेख यांनी विद्यालयाच्या गुणवत्ताधारित शिक्षण पद्धतीची माहिती देत सर्वांगीण विकास हेच ध्येय असल्याचे सांगितले. या प्रसंगी संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, कर्मचारी व पालक उपस्थित होते. प्रवेश निश्चित झालेल्या विद्यार्थ्यांचे चेअरमन अशोकराव काळे, आमदार आशुतोष काळे व सचिव चैतालीताई काळे यांनी अभिनंदन केले.

# महिलांनी आत्मविश्वासाने निर्णय प्रक्रियेत सहभाग घ्यावा : शालिनीताई विखे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**प्रवरानगर** : तुमच्या मनगटात बळ आहे, म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'नारीशक्ती वंदन' विधेयकाचे पाठबळ महिलांच्या पाठीशी उभे केले आहे. ज्या क्षेत्रात तुम्ही काम करत आहात, तिथे स्वतःला कधीही कमी लेखू नका; उलट अधिक ज्ञान मिळवण्यासाठी सातत्याने पुढे जात राहा.

संसदेत मांडण्यात आलेल्या 'नारीशक्ती वंदन' विधेयकास पाठिंबा देण्यासाठी जनसेवा फाउंडेशनच्या वतीने आयोजित 'नारीशक्ती वंदन महिला संमेलना'त त्या बोलत होत्या. शालिनीताई विखे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या संमेलनास अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. याप्रसंगी बोलताना विखे म्हणाल्या की, संकटाला सामोरे जाण्याची शक्ती महिलांमध्ये उपजतच आहे. मात्र, अधिक प्रगती करायची असेल, तर अनुभव घेऊनच मार्गक्रमण करावे लागते. नारीशक्ती वंदन विधेयकामुळे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परिवर्तन होणार आहे. 'चूल आणि मूल' या चक्रात अडकलेली महिला आता आपल्या मनगटातील बळावर अधिक जिद्दीने पुढे जाईल.

या विधेयकाच्या पाठबळामुळे सर्वच क्षेत्रांत नेतृत्व करण्याची मोठी संधी महिलांना मिळणार आहे. जिल्हा परिषदेमध्ये अध्यक्षपदाची संधी मिळाल्यानंतर, अनुभव घेत आपण स्वतःला सिद्ध केल्याचे सांगून त्या म्हणाल्या की, राजकारण विरहित विकास प्रक्रिया आणि जातीभेदाच्या पलीकडे जाऊन विचार केल्यामुळेच समाज आपल्या पाठीशी उभा राहतो. अशाच पद्धतीने आपण सर्वांनी काम करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या संमेलनात नगराध्यक्षा जयश्री थोरात, भाजपच्या प्रदेश सचिव गीता गिल्डा यांच्यासह जिल्ह्यातील सर्व महिला मोर्चाच्या मंडल अध्यक्षा उपस्थित होत्या. उपस्थित महिलांनी हात उंचावून आणि घोषणा देऊन या ऐतिहासिक विधेयकास उत्स्फूर्त समर्थन व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपच्या प्रदेश सचिव गीता गिल्डा यांनी केले.

## 'आनंद गुरुकुल'मध्ये गुणवंतांचा गौरव

### पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**सोनगाव** : सात्रळ येथील आनंद गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये पारितोषिक वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सहशालेय यशाचा गौरव करताना संपूर्ण परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन होते, तर प्रमुख अतिथी म्हणून योगेश चोरमुंगे उपस्थित होते.

त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले. ऑलिंपियाड परीक्षांमध्ये (इंग्रजी, गणित, विज्ञान व सामान्य ज्ञान) यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच टीआयएसडी, मुंबई यांच्या वतीने आयोजित संविधान लेखन हस्ताक्षर स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांनाही सन्मानित करण्यात आले. विज्ञान प्रदर्शनातील विजेत्यांनाही प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी शिक्षिका मंजुषा घोलप यांना त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल विशेष पुरस्कार देण्यात आला.

प्रमुख अतिथी योगेश चोरमुंगे यांनी विद्यार्थ्यांना जिद्द, मेहनत व सातत्याच्या जोरावर यश मिळवण्याचे मार्गदर्शन केले.कार्यक्रमास चेअरमन डॉ. के. के. बोरा, कार्यकारी अध्यक्ष राहुल बोरा, प्राचार्या, उपप्राचार्या, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रलंबित कामांवरून तनपुरेंनी अधिकारी व नगरसेवकांची घेतली झाडाझडती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : माजी खासदार प्रसाद तनपुरे यांनी अधिकारी व नगरसेवकांची झाडाझडती घेतली. प्रलंबित विकास कामे आणि प्रशासकीय कामे गतिमान करा. नगरपरिषदेत दररोज आळीपाळीने नगरसेवकांनी हजेरी लावा. लोकांना हेलपाटे मारायला लावू नका. जनतेची कामे तात्काळ मार्गी लावा, अशा सूचना तनपुरे यांनी दिल्या. राहुरी नगरपरिषद कार्यालयात नगराध्यक्षांच्या दालनासमोर मोकळ्या जागेत खुर्च्या टाकून तनपुरे यांनी बैठक घेतली. मुख्याधिकारी अभिजित हराळे, नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, उपनगराध्यक्ष गजानन सातभाई, गटनेते हर्ष तनपुरे, पालिकेतील विरोधी पक्षनेते अरुण साळवे, नगरसेवक चंद्रकांत उर्फ राजेंद्र उंडे, अविनाश म्हस्के, शहाजी ठाकूर, निलेश जगधने, आरिफ शेख उपस्थित होते. तनपुरे यांनी नगरपरिषदेच्या विविध खात्यांच्या खाते प्रमुखांना बोलावून त्यांच्या संदर्भातील कामकाजाचा आढावा घेतला.

मुळा धरण येथील पिण्याच्या पाणी योजनेसाठी सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम चालू एप्रिल महिना अखेर पूर्ण करावे. जेणेकरून एक मे पासून पाणी योजनेचे वीजबिल बचतीला सुरू होईल. नगरपरिषद हद्दीतील झाडांची गणना करून कार्बन क्रेडिट मिळविण्याचा प्रयत्न करावा. भूमिगत गटार योजनेच्या एचटीपी प्लांटची प्रलंबित कामे युद्धपातळीवर मार्गी लागावी. १ जून रोजी एचटीपी प्लांट कार्यान्वित करून शहरातील गटारीचे निम्मे पाणी शुद्धीकरणास सुरुवात करावी. राष्ट्रीय महामार्गाच्या बाजूच्या गटारीच्या पाण्याच्या जलवाहिन्या एचटीपी प्लांटला जोडाव्यात. हे काम तीन महिन्यात पूर्ण करून भूमिगत गटार योजना पूर्ण क्षमतेने सुरू करावी. नगरपरिषद इमारतीला आतून रंगकाम करावे. थकित कर वसुलीला प्राधान्य द्यावे. संगणकीकरणातील त्रुटी दूर कराव्यात. नागरिकांना थकीत कर भरण्यासाठी, जन्म-मृत्यूचे दाखले मिळण्यासाठी हेलपाटे मारावे लागू नयेत. प्रशासन गतिमान करावे. कार्यालयीन वेळेत कर्मचाऱ्यांनी गळ्यात ओळखपत्र घालावे. कार्यालयीन शिस्त बाळगावी, अशा सूचना तनपुरे यांनी दिल्या.

# जलसंवर्धनासोबत जलव्यवस्थापन गरजेचे

### प्रवरानगरात जनजागृती रथाला हिरवा झेंडा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**प्रवरानगर** : जलसंवर्धनाबरोबरच जलव्यवस्थापन ही काळाची गरज बनली असून, या दृष्टीने जलसंपदा विभाग नव्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून करत असलेले बदल अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत, असे प्रतिपादन माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के यांनी केले. जलसंपदा विभागाच्या वतीने आयोजित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा' निमित्त जनजागृती रथाला हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आला. या कार्यक्रमास अण्णासाहेब म्हस्के पाटील व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी चेअरमन नंदकिशोर राठी, भाजीपाला सोसायटीचे उपाध्यक्ष विजय लगड, बापूसाहेब आहेर, सरपंच कल्पना मैड, अनिल विखे, अशोक विखे, संजय आहेर, दादासाहेब घोगरे, जलसंपदा विभागाचे अभियंता योगेश घोगरे, सहाय्यक अभियंता अश्लेषा गमे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. या जनजागृती रथाच्या माध्यमातून प्रत्येक गावात जलव्यवस्थापनाबाबत प्रबोधन करण्यात येणार आहे. यंदाचे वर्ष 'जागतिक महिला शेतकरी वर्ष' असल्याने या मोहिमेत महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला जाणार आहे. आपल्या भाषणात अण्णासाहेब म्हस्के यांनी सांगितले की, नामदार राधाकृष्ण विखे यांच्या नेतृत्वाखाली जलसंपदा विभागात आमूलाग्र बदल होत आहेत.

पारंपरिक पद्धतीऐवजी अत्याधुनिक यंत्रणेद्वारे पाण्याचे व्यवस्थापन अधिक कार्यक्षम करण्यावर भर देण्यात येत आहे. धरणांच्या लाभक्षेत्रातील प्रत्येक शेतकऱ्याला पाण्याचा समन्यायी लाभ मिळावा, हा विभागाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले. मागील हंगामात चांगल्या पावसामुळे धरणे भरली असली, तरी भविष्यात पावसातील अनिश्चितता लक्षात घेता पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे यांनी जलसंपदा विभागाने सलग दुसऱ्या वर्षी या उपक्रमाचे आयोजन करून जनजागृतीला दिलेले प्राधान्य कौतुकास्पद असल्याचे सांगितले. प्रत्येक गावात पोहोचणाऱ्या या रथामुळे जलव्यवस्थापनाबाबत जनजागृती अधिक प्रभावी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## तांभेरे गावात डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील तांभेरे (तांबे वस्ती) तांभेरे-गुहा रोड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. संपूर्ण परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. संघर्ष मित्र मंडळ, तरुण व नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला. यावेळी रिपब्लिकन सेनेचे जिल्हा प्रमुख राजूभाऊ आढाव यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत मार्गदर्शन केले. जय भीमच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. डॉ. आंबेडकर यांच्या गीतांवर उपस्थित आबालवृद्धांनी जल्लोषात नृत्य केले.

कार्यक्रमादरम्यान भीमसैनिकांसाठी अन्नदानाचेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे संतोष चोळके, बाबा साठे, भीम आर्मीचे श्याम जाधव, अध्यक्ष भाऊसाहेब नाना तांबे, अक्षय कर्डिले आदी मान्यवर उपस्थित होते. राहुरी पोलीस ठाण्याचे कॉन्स्टेबल भांड व बागुल यांनीही भेट दिली. कार्यक्रमाची प्रस्तावना अशोक बाबुराव तांबे यांनी केली.

## मतदार यादी सखोल पुनरिक्षणासाठी राजकीय पक्षांनी सहकार्य करावे : सावंत पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रासह २२ राज्यांमध्ये मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (एस.आय.आर.) राबविण्यात येणार असून, या प्रक्रियेस राजकीय पक्षांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन प्रांताधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी किरण सावंत पाटील यांनी केले. गुरुवारी (दि. १६) प्रांताधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातील विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. सावंत पाटील यांनी सांगितले की, मतदार यादी अधिक पारदर्शक व अचूक करण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यासोबतच राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींचा (बीएलए) सहभाग महत्त्वाचा आहे. प्रत्येक पक्षाने आपल्या स्तरावर बीएलएची नियुक्ती करून प्रशासनास सहकार्य करावे, जेणेकरून एकही पात्र मतदार वंचित राहणार नाही. एसआयआर पूर्वतयारी अंतर्गत २०२४ च्या मतदार यादीचे २००२ च्या यादीशी मॅपिंग करण्याचे काम श्रीरामपूर मतदारसंघात सुमारे ८० टक्के पूर्ण झाले असून उर्वरित काम लवकरच पूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी 'इसीआयनेट' ॲपद्वारे २००२ मधील नावे शोधण्याचे प्रात्यक्षिकही दाखवण्यात आले. बैठकीस विविध प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

तहसिल कार्यालय कोपरगाव
क. कावि/फौजदारी/हस्ते/२०२६
कोपरगांव दि. ०१.२०२०

कोपरगांव पेधीत में. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात.

सबिहा एजाज शेख /
सबिहा सिकंदर खान, रा. कोल्हार ता.राहाता – **अर्जदार**
विरुध्द सामनेवाले
निबंधक जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी
तथा मुख्याधिकारी में.प. कोपरगांव
ता. कोपरगांव, जि, अहिल्यानगर – **सामनेवाले**

ज्याअर्थी, अर्जदार सबिहा एजाज शेख रा. कोपरगांव यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये आर्जदार यांचा दिनांक ०१.०७.१९८५ रोजी मौजे. कोपरगांव ता.कोपरगांव येथे जन्म झाल्या आहे. अर्जदार यांचे जन्माची नोंद मुख्याधिकारी न.प. कोपरगांव, ता. कोपरगांव जि अहिल्यानगर यांचेकडे अनावधानाने करावयाची राहुन गेली आहे तथापी अर्जदार यांची जम्माची नोंद जन्म-मृत्यु रजिष्ठरला नोंद होण्याकामी तसा में, कोर्टचा आदेश होण्याकामी चौकशी अर्ज या में, कोर्टात दाखल केलेला आहे

तरी अर्जदार यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये अर्जदार यांचे दिनांक ०१.०७.१९८५ रोजी मौजे कोपरगांव तप्कोपरगांव येथे जन्म झाता आहे. सबिहा सिकंदर खान यांचे जन्माची नोंद मुखाधिकारी न.प. कोपरगांव ता कोपरगांव जि अहिल्यानगर, येथे होण्याबाबत कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्री पुराव्यांसह सदरची हरकत में, कोर्टासमोर हजर होवून पुराव्यानिशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर जनाची नोंद करण्मास कोणाचीही हरकत नाही. असे समजून में, न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करेल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालनार नाही याची जाहीर नोंद या जाहीर नाम्याने घेण्यात यावी, कळावे

आज दि. ०१.२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानौशी दिले.

हुकूमावरुन
तहसिलदार कोपरगांव

### सायटेशन नोटीस

प्रो.पी. जमा.रु.
पान.नं.दि. / /२०१६

शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात
चौ.अ.नं. १८६/२०२६

**अर्जदार** – सतिष शिवाजी ढवळे, रा. हिंगणगाव ने. ता. शेवगाच
**सामनेवाला**– सरकार

सदर अर्जदार हा मौजे हिंगणगाव ने. येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार सतिष शिवाजी ढवळे, रा. हिंगणगाव ने. ता. शेवगाव, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर यांचा स्वतःचा जन्म दिनांक १८/०९/१९९१ मौजे हिंगणगाव ने, ता. शेवगाव, जि.अ.नगर असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्मचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म/मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांचा स्वतःचा जन्माची नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळू शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांचा स्वतःचा जन्माची नोंद पंचायत समिती कार्यालय/ग्रापचांयत कार्यालय यांच्या जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद घेवून तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार याने नगरपरिषद/ग्रामपंचायत कार्यालय येथे जावून जन्म/ मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात मृत्युची नोंद नसलेबाबत दि. ०६/०१/२०२६ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे.

जन्म/मृत्युच्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म/मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवू शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांचा स्वतःच्या जन्माचा नोंद जन्म/मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहून अर्जदाराचे सदरहू जन्म/मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर ह्या जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन पंधरा दिवसाचे आत दि. २८/०४/२०२६ पुर्वी त्याने ह्या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म/मृत्यु नोंद घेणेचाचत आदेश करतील.

आज दि. १३/०४/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

**हुकुमावरुन**
**तहसिलदार शेवगाव**

# पीण्याच्या पाण्याअभावी आदिवासींची वणवण; बुळे पठारावरील गंभीर परिस्थिती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**म्हैसगाव** : राहुरी तालुक्यातील चिखलठाण येथील बुळे पठार परिसरातील आदिवासी वाड्यांमध्ये सध्या तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून, प्यायच्या पाण्यासाठी ग्रामस्थांना अक्षरशः वणवण भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे विहिरी, बोअरवेल व ओढे आटल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. या कडे कुणी लक्ष देत नाही म्हणून विधानसभा मतदानाला आदिवासींकडून मतदान करण्यास नाकार दिला आहे त्यामुळे याला चांगलाच फटका बसणार आहे. स्थानिक आदिवासी महिलांना दररोज अनेक किलोमीटर अंतर पार करून पाणी आणावे लागत आहे.

काही ठिकाणी सकाळपासूनच पाण्यासाठी रांगा लागतात, मात्र पाणी उपलब्ध होत नसल्याने अनेकांना रिकाम्या हंड्याने परतावे लागते. त्यामुळे महिला, लहान मुले मुली व ज्येष्ठ नागरिक यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पाण्या आभावी हातले काम पण बंद झाले आहे त्यांना पुढे उपाशी दिवस काढावा लागणार आहे असे दिसत आहे ग्रामपंचायत ने ही याकडे दुरू लक्ष केले आहे एक टँकरने सुद्धा पाणी घेऊन आला नाही . ग्रामस्थ बरोबर पाळीव प्राण्यांचे ही खूप हाल होत आहे पाण्याविना त्यांना दिवस काढावा लागत आहे त्याचा प्रश्न मिटणार नसल्याचे संकेत ग्रामस्थांच्या मनात आले आहे. ग्रामस्थांच्या मते, प्रशासनाकडून पाणीपुरवठ्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. टँकरची मागणी वारंवार करूनही त्या मागणीला पायदळी तुडवली आहे अद्याप नियमित पुरवठा सुरू झालेला नाही.

या बाबत पंचायत समिती राहुरी तहसील कार्यालय याना ग्रामस्थनी निवेदन दिले आहे याचा काही उपयोग होतो का नाही नाहीत पाण्यासाठी भटकंती सुरू ठेवावी लागते की काय असे प्रश्न निर्माण झाले आहे परिणामी, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी तात्काळ पाणीटंचाई निवारणासाठी टँकर सुरू करावेत, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. एकूणच, बुळेपठारावरील आदिवासी बांधवांना मूलभूत गरज असलेल्या पाण्यासाठी झगडावे लागत असल्याचे चित्र समोर आले असून, प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. ग्रामपंचायत मध्ये सरपंच पद नसल्यामुळे प्रशासक व ग्रामसेवक म्हणून कार्यरत असलेले हे ही लक्ष देत नाही त्यामुळे पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे. विधानसभेचे इलेक्शन लागल्यामुळे याकडे कोणताच नेता लक्ष देत नाही हे इलेक्शन संपत पर्यंत आमच्या पाण्याची हाल थांबतील की नाही असे बोलले जात आहे या मा गट विकास आधिकारी राहुरी तहसील कार्यालय राहुरी यांना निवेदन देण्यात आले आहे यावर, मच्छिंद्र दुधवडे, रघुनाथ बुळे सह्या केल्या आहे .

## पान १ वरुन

### अल्पवयीन मुलीवर वडिलांसह दोघांकडून अत्याचार

त्यांच्या पथकाने दि १४ एप्रिल २०२६ रोजी रात्री बेड्या ठोकल्या. या दोन्ही आरोपींना बुधवार दि १५ एप्रिल रोजी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाकडून त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. पुढील तपास कर्जत जामखेडचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद लोखंडे हे करित आहेत.

### शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांचे क्षेत्रफळ वाढणार

होणार आहे.तसेच, आधुनिक तंत्रज्ञानाचा विचार करून प्रत्येक खोलीमध्ये इंटरनेट व दूरध्वनी सुविधा पॉईंट उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बहुमजली इमारतींमध्ये जिने, कॉरिडॉर आणि इतर सामाईक सुविधा स्वतंत्रपणे नियोजित करण्यात येणार आहेत, ज्यामुळे रहिवाशांना अधिक सोयीस्कर व सुरक्षित वातावरण मिळेल.

महत्त्वाचे म्हणजे, हा निर्णय केवळ नव्याने सुरू होणाऱ्या बांधकाम प्रकल्पांसाठीच लागू राहणार आहे. सध्या बांधकामाधीन किंवा पूर्ण झालेल्या शासकीय निवासस्थानांवर या निर्णयाचा कोणताही परिणाम होणार नाही. तसेच आधीच वाटप झालेल्या घरांच्या श्रेणीमध्ये कोणताही बदल करण्यात येणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.या निर्णयामुळे राज्यातील लाखो शासकीय कर्मचाऱ्यांना दर्जेदार व आधुनिक निवास सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, त्यांच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### खोटा शेतमाल दाखवून बँकेची २३ कोटी ३३ लाखांची फसवणूक

अटक करण्यात आले. सदर आरोपीला न्यायालयापुढे हजर केले असता न्यायालयाने त्याला आठ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान बँकेतील हा कर्जाचा घोटाळा गेल्या ५ वर्षापासून सुरू होता अशी माहिती मिळत असून यात बँकेतील लोक देखील असल्याचा संशय आहे. बँकेतील या प्रकरणी रिझर्व बँकेने १० एप्रिल रोजी या बँकेवर सहा महिन्याचे निर्बंध लादले असून , या घोटाळ्याचा आकडा वाढण्याची शक्यता देखील वर्तवली जातेय. दरम्यान या प्रकरणाची आर्थिक गुन्हे शाखेकडून सखोल तपासणी होत आहे.रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं बँकिंग नियमन कायदा १९४९ चा वापर करत मोतिराम अग्रवाल जालना मर्चंटस को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडवर निर्बंध घातले आहेत. हे निर्बंध १० एप्रिल २०२६ ला बँकेचं कामकाज संपल्यापासून लागू झाले आहेत. बँकेची आर्थिक स्थिती बिघडल्यानं आरबीआयनं हा निर्णय घेतला आहे. आरबीआयनं या बँकेवर निर्बंध टाकल्यानं १० एप्रिलनंतर या बँकेला आरबीआयच्या लेखी परवानगीशिवाय नवी कर्ज देणे, गुंतवणूक करणे, ठेवी स्वीकारणे यास मनाई करण्यात आली आहे. याशिवाय बँकेस त्यांच्याकडील मालमत्तेची विक्री करणे, देणी देणे यास मनाई करण्यात आली आहे. आरबीआयनं घातलेल्या निर्बंधांची माहिती बँकेत दर्शनी भागात ठेवीदार, ग्राहकांच्या माहितीसाठी लावण्यात यावी. याशिवाय ही माहिती बँकेच्या वेबसाईटवर देखील द्यावी, असं आरबीआयच्या आदेशात सांगण्यात आलं आहे. बँकेकडे सध्या असलेल्या ठेवींपैकी काही रक्कम काढण्यास देखील मनाई करण्यात आली आहे. मात्र, आरबीआयच्या निर्देशानुसार ठेवींमधील रकमेचा वापर कर्ज भरण्यास करायचा असल्यास करता येऊ शकतो. बँकेची आर्थिक स्थिती कमजोर झाल्यानं आरबीआयनं निर्बंध घातले आहेत.

### 'सध्याच्या ५४३ जागांमध्येच ३३ टक्के महिला आरक्षण द्या'

पंतप्रधानांवर निशाणा साधताना त्या म्हणाल्या, राजीव गांधी यांनी पंचायत आणि नगरपालिकांमध्ये ३३ टक्के आरक्षण देण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्याला भाजपनेच विरोध केला होता. मोदींनी सभागृहाला नेहमीप्रमाणे अर्धीच गोष्ट सांगितली. पुढे पी.व्ही. नरसिंह राव यांच्या काळात हे विधेयक मंजूर झाले आणि आज देशात १५ लाख महिला प्रतिनिधी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत आहेत.

२०१० मध्ये मनमोहन सिंग सरकारच्या काळात हे विधेयक राज्यसभेत मंजूर झाले होते, मात्र लोकसभेत सर्वसंमती अभावी रखडले. आता सरकारने वेळ न घालवता हे आरक्षण तात्काळ अमलात आणावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

### विधान परिषदेच्या नऊ जागांसाठी १२ मे रोजी मतदान अन् निकाल...

मुंबई : महाराष्ट्र विधान परिषद येथील ९ जागांसाठी पुढील आठवड्यात निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या ९ सदस्यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येणार असल्याने १२ मे रोजी मतदान होणार आहे. १२ मे रोजी सकाळी ९ वाजल्यापासून दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होईल. तर १२ मे रोजीच निकाल जाहीर होणार असल्याची माहिती समोर आली आहे. विधान परिषदेसाठी आता राजकीय हालचालींना वेग आला आहे. सध्याच्या महाराष्ट्र विधानसभातील संख्याबळाचा विचार करता, सत्ताधारी महायुतीला स्पष्ट आघाडी असल्याचे चित्र आहे. अंदाजानुसार भाजपच्या वाट्याला ५, शिवसेनेला २, राष्ट्रवादी काँग्रेसला १ आणि महाविकास आघाडीला १ जागा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, राष्ट्रवादीकडे असलेली अतिरिक्त मते लक्षात घेता महायुतीने अधिक उमेदवार दिल्यास निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता कमी असल्याचे मानले जात आहे.

# स्वच्छतेच्या वाटचालीत श्री शारदा स्कूल आघाडीवर ; अंतिम फेरीत स्थान



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** गांधी तीर्थ फाउंडेशन,वर्धा यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या गांधी तीर्थ स्वच्छ शाळा अभियान या उपक्रमात सोमैया विद्या विहार संचलित श्री शारदा इंग्लिश मिडीयम स्कूल कोपरगाव या शाळेने उल्लेखनीय सहभाग नोंदवत अंतिम टप्प्यात आपले स्थान निश्चित केले आहे. या पार्श्वभूमीवर शाळेत नुकतीच तपासणी पार पडली.

या तपासणीसाठी गांधी तीर्थ फाउंडेशनचे गिरीश कुलकर्णी, चंद्रशेखर पाटील आणि संजय जाधव उपस्थित होते. त्यांनी शाळेतील विविध प्रकल्पांची सखोल पाहणी करत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या उपक्रमांचे बारकाईने मूल्यमापन केले.तपासणीदरम्यान वर्गखोली, क्रीडांगण, ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा तसेच संगणक कक्ष या ठिकाणांवरील स्वच्छता, नीटनेटकेपणा आणि व्यवस्थापन यांचे निरीक्षण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वच्छतेबाबत घेतलेली पुढाकार आणि त्यांची सादरीकरणाची पद्धत पाहून मान्यवरांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी गिरीश कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत दैनंदिन जीवनात स्वच्छता कशी अंगीकारावी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच श्री. तुरकाने यांनीही स्वच्छतेविषयी प्रेरणादायी विचार मांडत विद्यार्थ्यांना जागरूक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. होन यांनी उत्कृष्टरीत्या केले. कार्यक्रमास शाळेचे प्राचार्य के. एल. वाकचौरे, उपप्राचार्या अमृतकर तसेच समन्वयक प्रसाद भास्कर यांची प्रमुख उपस्थिती होती. विशेष म्हणजे, राज्यभरातील एकूण २६५ शाळांमधून निवड प्रक्रियेनंतर श्री शारदा इंग्लिश मिडीयम स्कूल कोपरगाव या शाळेने अंतिम ४२ शाळांमध्ये स्थान मिळवून कोपरगावच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भर घातली आहे.

या यशामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता वाढण्यास चालना मिळाली असून,शाळेच्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे फलित असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# अयोध्यानगर मंदिरात प्रतिष्ठापणा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** येथील अयोध्यानगर ,जीवनगंगा परिसरात श्री गणेश, रामेश्वर महादेव, प्रभु रामचंद्र यांच्या मुर्तींची एक एप्रिलला मिरवणुक काढण्यात आली. विधिवत पुजेने १२ ते १४ एप्रिल या कालावधीत नांदगाव (ता. वैजापूर) येथील ह.भ.प. गुलाबगिरी महाराज यांच्या हस्ते स्थापना करण्यात आली.

शिऊर येथील संत बहीणाबाई संस्थान येथील प्रवचन व महाप्रसादाने सांगता झाली. यावेळी आमदार रमेश बोरनारे, नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, बाजार समिती उपसभापती शिवकन्या मधुकर पवार नगरसेविका सुप्रिया व्यवहारे, अयोध्यानगर व जीवनगंगा परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# आत्मा मालिकला राज्यस्तरीय विज्ञान जथ्था पुरस्कार



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** मुंबई विज्ञान अध्यापक मंडळ आयोजित डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेमध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यालयास दिला जाणारा राज्यस्तरीय 'विज्ञान जथ्था' पुरस्काराने आत्मा मालिक सेमी इंग्लिश मिडीयम गुरुकुलला सन्मानित करण्यात आले.

आत्मा मालिक सेमी इंग्लिश मिडीयम गुरुकुल सर्व स्पर्धा परीक्षांमध्ये राज्यात प्रथम स्थानावर आहे. डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेमध्ये गुरुकुलाचे २६ विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड झाली. त्यामध्ये कृष्णा लोखंडे, श्लोक कदम सुवर्णपदकासह राज्यात प्रथम, आरव नाणेकर, राम जाधव, श्रेयश भवर रौप्य पदकासह राज्यात द्वितीय क्रमांक मिळविला.मुंबईतील यशवंतराव नाट्यमंदिरामध्ये डॉ. अशोक नगरकर यांच्या हस्ते सेमी इंग्लिश मिडीयम गुरुकुलास विज्ञान जथ्था पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी डॉ. मधुबाला चिंचाळकर, अच्युतराव माने, आत्मा मालिकचे प्राचार्य निरंजन डांगे, विभागप्रमुख सचिन डांगे, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव होन, विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदिप भंडारी, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्षे, मिरा पटेल आदींनी अभिनंदन केले.

# राहुरी मतदार संघातील अपंग, व ज्येष्ठ नागरिकांसाठी १७ व १८ एप्रिलला ''होम वोटिंग'' प्रक्रिया

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

राहुरी : भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार, २२३-राहुरी विधानसभा मतदारसंघामध्ये ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या (झथ्रू) टपाली मतदानासाठी मान्य मतदारांसाठी दिनांक १७ एप्रिल २०२६ आणि १८ एप्रिल २०२६ रोजी तसेच गरज भासल्यास १९ एप्रिल २०२६ रोजी 'होम वोटिंग' अर्थात गृह मतदान प्रक्रियेचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रक्रियेसाठी १९ एप्रिल हा दिवस राखीव ठेवण्यात आला आहे. निवडणूक प्रक्रियेत सर्वांचा सहभाग वाढवण्यासाठी आणि शारीरिक अडचणींमुळे मतदान केंद्रावर येऊ न शकणाऱ्या मतदारांना मतदानासाठी सुलभ प्रक्रिया निर्माण करून



देण्यासाठी ही सुविधा पुरवण्यात येत आहे. गृह मतदानाची प्रक्रिया सकाळी ७:०० वाजल्यापासून सुरू होईल. ज्या मतदारांनी '१२-डी' अर्ज भरून या सुविधेची मागणी केली आहे, त्यांच्यासाठीच ही सुविधा उपलब्ध असेल. प्रत्येक पथकामध्ये दोन मतदान अधिकारी, एक शिपाई, एक सूक्ष्म निरीक्षक, एक पोलीस कर्मचारी आणि एक व्हिडिओग्राफर यांचा समावेश असेल. ही सर्व प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि गोपनीय राखली जाईल. सदर प्रक्रियेसाठी नमुना १० भरून उमेदवाराने नेमणूक केलेले मतदान प्रतिनिधी उपस्थित असतील. निवडणूक निर्णय अधिकारी २२३ राहुरी विधानसभा मतदारसंघ यांच्यातर्फे या प्रेस नोट द्वारे आवाहन करण्यात येते की, ''राहुरी मतदारसंघातील अपपर्शीॲश १२ अन्वये विहित केलेल्या नोंदवहीतील पात्र मतदारांनी दिनांक १७ व १८ एप्रिल रोजी आपल्या निवासस्थानी उपस्थित राहून मतदानप्रक्रिया पार पाडणेकामी सहकार्य करावे. जर पहिल्या भेटीत मतदार घरी उपलब्ध नसतील, तर पथक दुसऱ्यांदा भेट देईल. मात्र, त्यानंतर ही संधी मिळणार नाही.

# प्रवरासंगम येथे डॉ. आंबेडकर जयंती विविध उपक्रमांनी साजरी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील प्रवरासंगम येथे महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच अर्चनाताई सुडके या होत्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच आज विविध क्षेत्रात स्त्री ही उच्च पदावर कार्यरत आहे.स्त्री शक्तीच्या उद्धारासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा मोठा आधार मिळाला असल्याचे प्रतिपादन सरपंच अर्चनाताई सुडके यांनी यावेळी बोलतांना केले.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी माजी सरपंच सुनीलराव बाकलीवाल व जयंती समितीचे अध्यक्ष माजी उपसरपंच नितीन गायकवाड,भारतीय लहुजी सेनेचे जिल्हा कार्याध्यक्ष शांतावन खंडागळे,संतोष मोरे,युवा नेते शुभम उगले, गजानन गवारे, नवनाथ चाबुकस्वार, टोका उपसरपंच काकासाहेब खंडागळे नितीन भालेराव यांच्या हस्ते पुष्पहार घालून व मेणबत्ती लावून डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूज न करण्यात आले.

जयंती सोहळ्याला संतोष मोरे, प्रकाश पांडव,दिनकर धस,सनी साळवी,मयूर भालेराव, सोमनाथ साठे,किरण भालेराव,लखन साठे,किरण चाबुकस्वार, गजानन शेलार, सचिन भालेराव,अनिल गायकवाड,सोमनाथ गायकवाड उपस्थित होते.

# धांदरफळ वीज उपकेंद्राची क्षमता दुप्पट; शेतकऱ्यांना दिलासा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** तालुक्यातील धांदरफळ वीज उपकेंद्रावरील ट्रान्सफॉर्मरची क्षमता ५ एमव्हीएवरून १० एमव्हीए करण्यात आली असून, नव्या ट्रान्सफॉर्मरचा शुभारंभ स्थानिक महायुतीच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत करण्यात आला. परिसरात वाढत्या वीज मागणीमुळे वारंवार होणारा खंडित पुरवठा आणि कमी दाबाचा प्रश्न गंभीर झाला होता. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत होता. शेतीसाठी आवश्यक वीजपुरवठा खंडित होत असल्याने पिकांचे नुकसान होत होते. ही बाब लक्षात घेऊन आमदार अमोल खताळ यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे ट्रान्सफॉर्मरची क्षमता दुप्पट करण्यात आली आहे.

नवीन क्षमतेमुळे धांदरफळ व परिसरातील गावांना आता सुरळीत व पूर्ण दाबाने वीजपुरवठा मिळणार असून, विजेचे खंडित होणे कमी होणार असल्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.



यावेळी मिलिंद खताळ, उमेश कोकणे, बाळासाहेब खताळ, सुरज खताळ, पियुष ठोंबरे, सर्वेश गुंजाळ, विकास खताळ आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

या कामासाठी वीज उपकेंद्राचे महादेव गुरसाळी, सचिन गभणे, कैलास कुदळ व अनिल डुबे यांनी विशेष परिश्रम घेतले. परिसरातील नागरिकांनी आमदार खताळ यांचे आभार मानले.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD AME KHAN AYAAN KHALED ( EFORE NAME ) TO NEW NAME AS AYAN KHALED KHAN (AADHAR NO. 9515 8743 958) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE: SHRIRAMPUR DATE : 16/04/2026

# कनकसागजची निवडणूक बिनविरोध नादीची जागा पुन्हा रिक्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यातील चार ग्रामपंचायतींच्या रिक्त जागांसाठी होत असलेल्या पोटनिवडणुकीत उमेदवारी अर्जाची छानणी बुधवारी तहसील कार्यालयात पार पडली. या प्रक्रियेत दाखल झालेले सर्व सहा अर्ज वैध ठरले असून, एका जागेवर बिनविरोध निवड झाली, तर एक जागा रिक्त राहिली आहे. कनकसागज येथील प्रभाग क्र. तीनमधील अनुसूचित जाती महिला राखीव जागेसाठी सुवर्णा दिगंबर भालेराव यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली.

नादी येथील प्रभाग एकमधील अनुसूचित जमाती महिलेसाठी राखीव जागेवर एकही अर्ज आला नाही, त्यामुळे ही जागा पुन्हा रिक्त राहिली. रोटेगाव येथील प्रभाग एकमधील सर्वसाधारण जागेसाठी तिघांचे अर्ज वैध ठरले आहेत. वांजरगाव येथील प्रभाग एकमधील नागरिक मागास प्रवर्गासाठी दोघांचे अर्ज दाखल आहेत. इच्छुक उमेदवारांना १७ एप्रिलपर्यंत आपले अर्ज माघारी घेता येणार आहेत. त्यानंतरच निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होईल.

# बालसंस्कार केंद्र हे युवा मनावर सुसंस्कार करणारी कार्यशाळा : प्रा. शिंदे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार:** गावागावातील स्वामी समर्थ केंद्रातील मोफत बालसंस्कार केंद्र हे युवा व बालमनावर सुसंस्कार करण्याची उत्तम कार्यशाळा आहे भरकटणाऱ्या युवा वर्गाला योग्य दिशा देण्याचे काम हे स्वामी केंद्रामार्फत केले जाते खरी आज संपत्ती आहे आर्थिक शारीरिक मानसिक व्यावसायिक विवांचना सोडवण्यासाठी योग्य मार्गदर्शन स्वामी केंद्रमार्फत केले जाते विज्ञान व त्याची सांगड घालून स्वामी केंद्रातील सेवेचे काम प्रत्येक सेवेकरी करीत असतो असे मौलिक विचार प्राध्यापक नवनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. कोल्हार राजुरी रोडवर असलेल्या श्री स्वामी समर्थ केंद्रातील गुरुचरित्र पारायण व नाम जप यज्ञ सोहळा सांगता प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी कोल्हार भगवतीपुर परिसरातील स्वामी सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सप्ताह सांगता सोहळ्याप्रसंगी यज्ञसेवा पूर्ण करण्यात आली अकरा सौभाग्य अलंकाराचे विधी व अर्पण करण्यात आले त्यानंतर श्री ची महाआरती संपन्न झाली बाल संस्कार केंद्राच्या मुला मुलींनी स्वामी समर्थ मार्गाच्या माहितीपर नाटिकेचे यावेळी सादरीकरण केले. उपस्थित भाविकांना यावेळीमहाप्रसादाचे वाटप करण्यात आले. पारायण सोहळा यशस्वी करण्यासाठी स्वामी कोल्हार येथील स्वामी समर्थ सेवा केंद्रातील स्वामी सेवकांनी विशेष परिश्रम घेतले.



## नशिबाची परिक्षा

**गुरुवार दि .१६ एप्रिल २०२६**

**मिलनम डे**

उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १८० २७० ९०० | ९-१ | १४६ १२८ ११९ | जोड ३१-२४-५७ १८-९० |

**कल्याण**

उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १९० १४५ ११८ | ०-६ | १२३ १५० ११४ | जोड ०३-२६-४५ १९-६७ |

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| २६० ३५० ११६ | ८-९ | १२६ १८० ११७ | जोड ८१-५९-७४ २०-९६ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

# पोलिसांवर गोळी झाडलेली घटना

## तब्बल ९ वर्षे फरार असलेल्या
# आरोपीस पोलीस दलाने केले जेरबंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कर्जत :** १८ जुलै २०१७ साली कर्जत पोलीस विभागाचे कर्मचारी चापडगाव (ता. कर्जत) येथे रात्रगस्त करीत असताना पिकअप वाहन चालकास पोलिसांनी थांबण्याचा प्रयत्न केला. मात्र तो न थांबता तसाच भरधाव वेगाने पुढे गेल्याने पेट्रोलिंग करणाऱ्या पथकाने त्यांचा पाठलाग केला असता पोलीस वाहन बबन पवार यांच्यावर गोळी झाडल्याची घटना घडली. त्यातील तिसऱ्या फरारी आरोपीस तब्बल ९ वर्षांनी कर्जत पोलिसांनी जेरबंद करण्यास यश मिळवले. आकाश ऊर्फ अक्षय बाजीराव गायकवाड (मिरजगाव, ता. कर्जत) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, १८ जुलै २०१७ रोजी सहायक फौजदार रत्नाकर मकासरे, पोलीस नाईक एस.डी. लोखंडे आणि वाहन चालक पोलीस नाईक बबन पवार हे सरकारी पोलीस वाहनात रात्र गस्त करत असताना पहाटे सव्वा तीन वाजता चापडगावहुन कर्जतच्या दिशेने एक पांढरा पिकअप वाहन निदर्शनास आले. वाहन चालक बबन पवार यांनी त्यास थांबण्याचा इशारा केला. मात्र पिकअप न थांबताच सुसाट निघाल्याने पोलीसांचा संशय वाढत त्यांनी पाठलाग सुरु केला. पिकअपची मागील ताडपत्री उडत असताना त्यामध्ये ३ गाय दिसल्याने त्या गायी चोरीचा असल्याचा पोलिसांचा संशय बळावला. सदर पिकअपला पुन्हा ओव्हरटेक करीत चालक पवार यांनी त्यास पुन्हा थांबण्याचा इशारा केला. पिकअपमध्ये एकूण तीन इसम निदर्शनास आले. यापैकी क्लिनरच्या बाजुला बसलेले एका इसमाने पोलीस चालक बबन पवार यांच्या अंगावर अग्नी शस्त्रातुन गोळी झाडली. यात पवार गंभीर जखमी झाले होते. या घटनेत तात्काळ रेवणनाथ प्रभाकर जाधव (वीट, ता. करमाळा) आणि पद्मराज अर्जुन डोणे (मिजरगाव, ता. कर्जत) यांना अटक करण्यात आले होते. मात्र आकाश ऊर्फ अक्षय बाजीराव गायकवाड हा तिसरा तब्बल ९ वर्षे फरार होता. आठ दिवसापूर्वी अक्षय गायकवाड हा पिंपरी चिंचवड परिसरात येणार असल्याची माहिती मिळाली असता पिंपरी चिंचवड क्राईम ब्राँच युनिट १ आणि कर्जत पोलीस विभागाने संयुक्त मोहिम राबवत त्यास जेरबंद करण्यात यश मिळवले.

दरम्यान, सदर घटनेत सहायक रत्नाकर मकासरे यांनी फिर्याद दाखल करीत वरील तिन्ही आरोपींवर जीवे मारण्याच्या प्रयत्न, सरकारी कामात अडथळा आणल्याचा कर्जत पोलीस ठाण्यात २००/२०१७, भादवि कलम ३०७, ३५३, ४२७ व ऑर्म अक्ट ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला होता.

## सालवडगाव येथील तरुणाच्या हत्येप्रकरणी
# मुख्य आरोपी रामा गाडेसह साथीदार अटकेत




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** शेवगाव तालुक्यातील सालवडगाव येथील तरुण संदीप दिनकर लांडे (वय ३२) यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी रामा चंद्रकांत गाडे व त्याच्या एका विधीसंघर्षित साथीदाराला शेवगाव पोलिसांनी अटक केली आहे. काही दिवसांपासून फरार असलेल्या आरोपींना गुरुवारी (दि. १६) पहाटे शिताफीने ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ११ एप्रिल रोजी संदीप लांडे हे आपल्या शेतात काम करत असताना त्यांच्या मित्रांनी त्यांना कामाच्या बहाण्याने शेवगाव शहरात आणले. डायमंड शाळेच्या पाठीमागील ढाकणे वस्ती परिसरात किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून आरोपींनी लाकडी काठी, पट्टा व दगडाने बेदम मारहाण केली. यात गंभीर जखमी झालेल्या संदीप यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी मयताचे वडील दिनकर लांडे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेनंतर आरोपी फरार झाले होते. त्यांचा शोध घेण्यासाठी पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी तीन पथके तयार केली होती.

गुप्त माहितीच्या आधारे १६ एप्रिल रोजी पहाटे आखेगाव रोडवरील पाण्याच्या टाकीजवळ आरोपी दबा धरून बसल्याचे समजताच पोलिसांनी सापळा रचला.

पोलिसांना पाहताच आरोपींनी पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी पाठलाग करून दोघांनाही अटक केली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बाजीराव सानप करत आहेत.

## द•ख•ल

### शहरातील नूतन केमिस्ट भवनाचे १९ एप्रिलला उद्घाटन

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट केमिस्ट अॅण्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने बुरुडगांव रोड येथे उभारण्यात आलेल्या नूतन केमिस्ट भवनाचे उद्घाटन रविवार, दि. १९ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. जिल्ह्यातील केमिस्ट बांधवांसाठी अनेक वर्षापासूनची ही स्वप्नपूर्ती होणार असून, हे भवन त्यांच्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार असून, या माध्यमातून संघटनात्मक बळकटीसह विविध उपक्रमांना चालना मिळणार आहे.

या केमिस्ट भवनाचे उद्घाटन अखिल भारतीय व महाराष्ट्र राज्य केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथजी उर्फ आप्पासाहेब शिंदे तसेच राज्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या प्रसंगी आमदार संग्राम जगताप, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

### प्रयास व दादी-नानी ग्रुपकडून महिलांच्या सक्षमीकरणाचा जागर

**अहिल्यानगर :** प्रयास ग्रुप व दादी-नानी ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या कार्य-कर्तृत्वाचा जागर करणारा कार्यक्रम रेणुका माता रिसॉर्ट येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमातून महिलांच्या सक्षमीकरणाचा संदेश देण्यात आला. या सोहळ्याप्रसंगी रेणुका माता मल्टीस्टेटच्या संचालिका मंगलाताई भालेराव, जयंती भालेराव, नगरसेवक ऋग्वेद गंधे, मीनलताई गंधे, सुमित वर्मा, जयश्री पोटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमासाठी दादी-नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयाताई गायकवाड, प्रयासच्या संस्थापक अध्यक्षा अलकाताई मुंदडा, शोभा मुळे, जयश्री पुरोहित, उपाध्यक्ष सुचेता बोरकर, खजिनदार मेघना मुनोत, राखी अहिर, छाया भंडारी, प्रतिभा रासकर, सुजाता कदम, आरती थोरात, लीला अग्रवाल, सुरेखा जंगम, अरुणा गोयल, अलका वाघ, सुनीता काळे, नीलिमा पवार, उषा सोनटक्के, प्रतिभा पेंडसे, आरती वाडेकर, आशा गायकवाड, रेखा फिरोदिया आदींसह ग्रुपच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमात जयश्री पोटे यांनी महिलांना स्कार्फ कसा बांधावा आणि ओढणी कशी घ्यावी याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. तसेच सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले यांचे नुकतेच निधन झाल्याबद्दल ग्रुपतर्फे त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रास्ताविकात जयाताई गायकवाड यांनी ग्रुपच्या कार्याचा आढावा घेतला. त्या म्हणाल्या की, मागील अनेक वर्षांपासून प्रयास ग्रुप महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्यरत आहे. महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जावी तसेच त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे यासाठी विविध उपक्रम राबविले जातात.

# 'भिंगार अर्बन बँकेची शाखा निघोजला होण्याची गरज'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** भिंगार अर्बन बँकेची शाखा निघोजला होण्याची गरज असल्याची मागणी शिवसेनेचे ओबीसी सेलचे जिल्हाप्रमुख खंडूजी भुकन यांनी केली आहे. भिंगार अर्बन बँकेचे चेअरमन अनिल झोडगे यांनी नुकतेच राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी त्यांचा ओबीसी सेलचे जिल्हाप्रमुख खंडूजी भुकन, मळगंगा यात्रा समीती अध्यक्ष शिवाजीराव लंके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी समीती सदस्य भास्करराव कवाद, तसेच झोडगे यांचे कुटुंब सदस्य उपस्थित होते. भुकन यावेळी म्हणाले सहकार चळवळीतील अग्रगण्य नेतृत्व गोपाळराव झोडगे यांनी भिंगार अर्बन बँकेची स्थापना करुण सर्वसामान्य जनतेला आधार देण्याचे काम केले आहे. या बँकेच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यात सहकारी चळवळीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. चेअरमन अनिल झोडगे व त्यांच्या संचालक मंडळाने अतिशय नेटका कारभार करीत बँकेचा विकासाचा आलेख उंचावत ठेवला आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यात्रा समीती सदस्य भास्करराव कवाद यांनी केले शेवटी यात्रा समीती अध्यक्ष शिवाजीराव लंके यांनी आभार मानले.

# बेलवंडी गावावर सीसीटीव्हीची नजर
## गावच्या सुरक्षेला नवे बळ-सरपंच ऋषिकेश शेलार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी गावामध्ये लोकनियुक्त युवा सरपंच ऋषिकेश शेलार यांच्या संकल्पनेतून गावाच्या सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून गावातील मुख्य बाजारपेठ, प्रमुख चौक तसेच इतर महत्त्वाच्या ठिकाणी जवळपास ५० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून, यामुळे संपूर्ण गाव डिजिटल नजरेखाली ठेवण्याची व्यवस्था उभारण्यात आली आहे. या सिसिटीव्ही प्रणाली चे उदघाटन बेलवंडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या हस्ते करण्यात आले.

गावातील वाढती वर्दळ, बाजारपेठेतील हालचाली आणि सुरक्षेच्या दृष्टीने येणाऱ्या अडचणी लक्षात घेता हा उपक्रम राबविण्यात आला. विशेषतः चोरी, वाद-विवाद, अपघात किंवा अन्य अनुचित घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सीसीटीव्ही प्रणाली प्रभावी ठरणार आहे. या कॅमेऱ्यांमुळे गावातील प्रत्येक महत्त्वाचा भाग २४ तास देखरेखीखाली राहणार असून, गरज पडल्यास फुटेजच्या आधारे तात्काळ कारवाई करणे शक्य होणार आहे, असा उपक्रम राबवणारे श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी हे पहिलेच गाव आहे.

सरपंच ऋषिकेश शेलार यांनी सांगितले की, गावाच्या सुरक्षिततेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणेहा या उपक्रमामागचा मुख्य उद्देश आहे. तसेच भविष्यात आणखी काही ठिकाणी कॅमेरे बसवण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.

व्यापारी, व्यावसायिक व ग्रामस्थांकडून या उपक्रमाचे स्वागत करण्यात येत असून, गावात कायदा व सुव्यवस्था राखण्यास याचा मोठा फायदा होणार असल्याची भावना बेलवंडी पोलीस ठाण्याचे पोलीस सहाय्यक निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांनी व्यक्त केली. गावाने घेतलेला हा निर्णय इतर गावांसाठीही आदर्श ठरत असून, ग्रामीण भागात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुरक्षा मजबूत करण्याचा एक उत्तम नमुना म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष आण्णासाहेब शेलार, नागवडे कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन ज्ञानदेव हिरवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर, सरपंच ऋषिकेश शेलार, उपसरपंच बाळासाहेब ढवळे,सोसायटीचे चेअरमन विजय काळाने, व्हा. चेअरमन ज्ञानदेव शेलार, सोपान हिरवे, उत्तम डाके, सुनिल ढवळे,युवराज पवार, संग्राम पवार, स्वप्नील घोडेकर, अश्रूद्दीन हवालदार आदीसह ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## शेवगाव तालुक्यात प्रथमच घरकुलांवर सोलर; दहिगावचा अभिनव उपक्रम



**शेवगाव :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत दहिगाव शे येथे प्रधानमंत्री घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांच्या घरांवर सोलर यंत्रणा बसविण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला असून, शेवगाव तालुक्यात हा पहिलाच उपक्रम ठरला आहे. या उपक्रमामुळे घरकुल लाभार्थ्यांना वीज बचतीसह स्वच्छ उर्जेचा लाभ मिळणार आहे.

या उपक्रमाचा लाभ महितुभाई फकीर शेख व गोकुळ अश्रूबा खेडकर या लाभार्थ्यांनी घेतला असून, त्यांच्या घरांवर सोलर यंत्रणा यशस्वीरीत्या बसविण्यात आली आहे. या उपक्रमाची अंमलबजावणी मा. आनंद भंडारी (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तसेच गटविकास अधिकारी सोनल शहा यांच्या सहकार्यामुळे या योजनेला गती मिळाली. ग्रामपंचायत स्तरावर सरपंच रामेश्वर भापकर व ग्रामविकास अधिकारी प्रशांत बरबडे यांच्या पुढाकारातून हे काम उत्कृष्ट पद्धतीने पार पडले. त्यांच्या नियोजनबद्ध कामकाजामुळे लाभार्थ्यांना वेळेत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. या उपक्रमामुळे दहिगाव शे गावाचा शाश्वत विकास साधण्यास मदत होत असून, इतर गावांसाठीही हा आदर्श निर्माण करणारा ठरत आहे.

# बाबासाहेबांनी सामाजिक क्रांती घडवून आणली : पवार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**ढोरजळगांव :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील विषमतेविरुद्ध, अस्पृश्यता निवारण, महिला सक्षमीकरण आणि कामगारांच्या हक्कासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांनी स्वातंत्र्य, समता व बंधुतेवर आधारित भारतीय राज्यघटनेची निर्मिती केली. दलीत व शोषित वर्गाला शिक्षण हक्क आणि आत्मसन्मानाने जगण्याची प्रेरणा देत त्यांनी सामाजिक क्रांती घडवून आणली, असे प्रतिपादन दत्तात्रय पवार यांनी केले.

भातकुडगाव माध्य व उच्च माध्य विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक दत्तात्रय पवार हे बोलत होते. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर व जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक लोकनेते स्व मारुतरावजी घुले पाटील साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी प्राचार्य सुरेश शेरे म्हणाले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळे देश एकसंघ राहून प्रगती करत आहे. कोणत्याही ग्रंथापेक्षा संविधान हाच ग्रंथ श्रेष्ठ आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सावतंत्र्य, समता आणि बंधुता व मानवता या मूल्यांची शिकवण देत समाजाच्या उद्धारासाठी दिलेला लढा आणि अस्पृश्यता निवारण, स्त्रीयांच्या हक्कासाठी व शेतकऱ्यांसाठी तळमळीने केलेले कार्य सर्वोत्तम आहे. त्यांच्या कार्यामुळे, त्यागामुळे आज आपण लोकशाही व समता अनुभवत आहोत. असे त्यांनी बोलताना सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील करंडे यांनी केले तर आभार प्रा दत्तात्रय सुडके यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## आढळगावच्या अनिल ठवाळ यांची केंद्र सरकारच्या
# दूरसंचार सल्लागार समितीवर नियुक्ती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील आढळगाव येथील अनिल ठवाळ यांची भारत सरकारच्या बीएसएनएल दूरसंचार सल्लागार समितीवर नियुक्ती झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. साध्या कार्यकर्त्यापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज केंद्र सरकारच्या पातळीवर पोहोचला असून, हा संघर्ष, जिद्द आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठरला आहे.

गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून अनिल ठवाळ यांनी तळागाळातील लोकांसाठी सातत्याने काम केले. कोणताही गाजावाजा न करता समाजातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या या कामाची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार, खासदार निलेश लंके यांच्या शिफारसीनंतर केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या स्वाक्षरीने त्यांची सल्लागार समितीवर नियुक्ती करण्यात आली आहे.

ठवाळ यांच्या या यशामागे खडतर संघर्षाचा प्रवास आहे. अनेक अडचणी, अपमान आणि प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जात त्यांनी आपली वाटचाल सुरू ठेवली. समाजसेवेचा ध्यास आणि जनतेप्रती असलेली निष्ठा यामुळेच त्यांना हे यश मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजश्री शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी सामाजिक कार्य केले. समानता, शिक्षण आणि न्याय या मूल्यांवर त्यांनी कायम भर दिला.

त्यांच्या नियुक्तीमुळे आढळगावसह संपूर्ण परिसरात , विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ही नियुक्ती नव्या जबाबदारीची सुरुवात असून, आगामी काळातही ते समाजासाठी कार्यरत राहतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# परवानगी न घेता जलजीवनची रस्ता खोदाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** केंद्र सरकारच्या 'हर घर जल' या महत्त्वाकांक्षी योजनेचा मूळ उद्देश ग्रामीण भागाचा विकास असला, तरी चिचोंडी (ता. पाथर्डी) परिसरात मात्र या योजनेला भ्रष्टाचाराची वाळवी लागल्याचे चित्र दिसत आहे. जलजीवन मिशनच्या मुख्य पाईपलाईनसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता मुख्य रस्ता उखडण्यात आला असून, यावरून आता मोठा वाद निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, या बेकायदेशीर कामाबाबत विचारणा करणाऱ्या पत्रकारांना कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांनी अरेरावी केल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जलजीवन मिशनच्या मुख्य पाईपलाईनसाठी चिचोंडी येथील मुख्य रस्ता चक्क ३ फुट अंतरावर खोदून मोठे 'वॉल' काढण्यात आले आहेत. रस्त्याच्या इतक्या जवळ वॉल असल्याने भविष्यात पाणी गळती



झाल्यास रस्ता कायमस्वरूपी खचण्याची किंवा खराब होण्याची भीती व्यक्त होत आहे. कोणत्याही सार्वजनिक रस्त्यावर खोदकाम करताना सार्वजनिक बांधकाम विभागाची रीतसर परवानगी घेणे आणि 'रिस्टोरेशन फंड' भरणे बंधनकारक असते.

मात्र, या नियमाला हरताळ फासून हे काम सुरू असल्याचे समोर आले आहे. **अधिकाऱ्यांची 'मिलीभगत' की हतबलता?** या अनधिकृत खोदकामाबाबत पत्रकारांनी घटनास्थळी जाऊन विचारणा केली असता, ठेकेदाराच्या कामगारांनी उद्धट भाषेचा वापर करत पत्रकारांना अरेरावी केली. शासकीय निधी आणि नियमांचा अपहार करण्यासाठी अधिकारी, कंत्राटदार आणि स्थानिक पुढाऱ्यांची 'मिलीभगत' असल्याचे संशय आता नागरिक व्यक्त करत आहेत.

### पत्रकार संघटना आक्रमक

लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांशी गैरवर्तन केल्याप्रकारामुळे पाथर्डी तालुका पत्रकार संघटना आणि ग्रामीण पत्रकार संघटना आक्रमक झाली आहे. भ्रष्टाचाराला खतपाणी घालणाऱ्या आणि पत्रकारांना अरेरावी करणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत संघटना शांत बसणार नाही, असा इशारा देण्यात आला आहे.

### जुन्या चुकांतून बोध नाहीच!

चार महिन्यांपूर्वीही मिरी-पांढरीपुल रस्त्यावर अशाच प्रकारे विनापरवाना खोदकाम झाले होते. त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाने नोटीस बजावून दंडात्मक कारवाईचा इशारा दिला होता. मात्र, अद्याप ठोस कारवाई न झाल्याने दोन्ही विभागांतील अधिकारी एकमेकांना पाठीशी घालत असल्याचा संशय बळावला आहे. आता या ताज्या प्रकरणावर प्रशासन नेमकी काय कारवाई करणार, की पुन्हा एकदा कागदी घोडे नाचवून भ्रष्टाचारावर पांघरूण घातले जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### जबाबदार काय म्हणतात?

आम्ही स्थानिक पुढाऱ्यांशी तोंडी चर्चा करून आणि समन्वय साधून रस्ता खोदला आहे. **राजू गांगुर्डे (साईट इंजिनिअर, जलजीवन)**

आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाला दोन वर्षांपासून पत्रव्यवहार करत आहोत, परंतु त्यांनी परवानगी दिली नाही. त्यामुळे स्थानिक पुढाऱ्यांशी चर्चा करून काम सुरू केले.
**– शरद दहिफळे (अधिकारी, जलजीवन)**

जलजीवनच्या अधिकाऱ्यांनी रीतसर शासकीय शुल्क भरलेले नाही, त्यामुळे आम्ही परवानगी नाकारली आहे. त्यांनी यापूर्वीही अनधिकृत कामे केली आहेत. आता प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांवर प्रशासकीय नियमानुसार गुन्हा दाखल करणार आहोत.
**–असिफ सय्यद (उपअभियंता, सा. बां. विभाग)**

### शासकीय महसुलावर दरोडा?

रस्ता खोदकामासाठी भरावा लागणारा 'शेतसारा' किंवा 'रिस्टोरेशन फंड' न भरता कंत्राटदाराने थेट रस्ता उखडल्यामुळे शासकीय महसुलाचे मोठे नुकसान झाले आहे. ही रक्कम नेमकी कोणाच्या खिशात गेली, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. विकासकामांच्या नावाखाली चाललेला हा उघड भ्रष्टाचार संशोधनाचा विषय बनला आहे.

# पुणे जिल्हा परिषद ऊर्जा स्वावलंबनाकडे

## काऱ्हाटीत ५ मेगावॅट सौर प्रकल्प, दिवे येथे १० मेगावॅट सोलार पार्क प्रस्तावित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

''**सासवड :** पुणे जिल्हा परिषदने ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत बारामती तालुक्यातील काऱ्हाटी येथे ५ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच पुरंदर तालुक्यातील दिवे येथे १० मेगावॅट क्षमतेचा सोलार पार्क प्रस्तावित करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील शासकीय वीज खर्चात बचत, अतिरिक्त उत्पन्न निर्मिती आणि पर्यावरण संरक्षण साध्य होणार आहे.



बारामती तालुक्यातील काऱ्हाटी येथे सुमारे १० हेक्टर क्षेत्रावर हा प्रकल्प उभारण्यात येणार असून, त्यासाठी अंदाजे २४.९४ कोटी खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पातून दरवर्षी सुमारे ८० लाख युनिट्स (८,००० मेगावॅट ) वीज निर्मिती होणार आहे.या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज जिल्हा परिषद अंतर्गत शाळा, कार्यालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि इतर शासकीय सेवांसाठी वापरली जाणार आहे. यामुळे वीज खर्चात मोठी बचत होणार आहे.

गरजेपेक्षा जास्त वीज ओपन ऍक्सेस पद्धतीने विक्री करून जिल्हा परिषदेला दरवर्षी कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या परिषद अधिक सक्षम होणार आहे. पुरंदर तालुक्यातील दिवे येथे १० मेगावॅट क्षमतेचा सोलार पार्क उभारण्याचा प्रस्ताव आहे. याशिवाय जिल्ह्यातील शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि अंगणवाड्यांचे सौर विद्युतीकरणही हाती घेण्यात आले आहे. या प्रकल्पाचा सविस्तर डीपीआर तयार करून तो महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री मा.अजित पवार यांच्यासमोर सादर करण्यात आला होता. त्यांच्या सूचनांनुसार प्रकल्प अधिक कार्यक्षम आणि दीर्घकालीन दृष्टिकोनातून मजबूत करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे कार्बन उत्सर्जनात लक्षणीय घट होणार असून स्वच्छ ऊर्जा निर्मितीला चालना मिळणार आहे. तसेच वीज वितरणातील तांत्रिक नुकसान कमी होऊन कार्यक्षमता वाढेल. सौर प्रकल्पांमुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण होतील. स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांना पूरक आर्थिक लाभ मिळण्याची शक्यता आहे. जिल्हा परिषद संपूर्ण जिल्ह्यात सौर ऊर्जा विस्तारासाठी व्यापक रोडमॅप तयार करत असून, भविष्यात विविध ठिकाणी असे प्रकल्प उभारण्याचा मानस आहे.

# पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यांचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत एप्रिल २०२६ महिन्यात पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यांच्या माध्यमातून जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींना विविध नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

रोजगार मेळाव्याचे २० एप्रिल रोजी वीर फिरंगोजी नरसाळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, दौंड, २१ एप्रिल रोजी मालोजीराजे भोसले शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, इंदापूर, २२ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औंध, २३ एप्रिल रोजी शहीद राजगुरु शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था खेड (राजगुरुनगर), ता. खेड आणि २७ एप्रिल रोजी तात्या टोपे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था शिरूर येथे आयोजन करण्यात येणार आहे.

या रोजगार मेळाव्यात दहावी, बारावी, पदविका, पदवीधर व पदव्युत्तर अशा विविध शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांसाठी रिक्त पदे उपलब्ध असणार आहेत. नामांकित उद्योजक या मेळाव्यात सहभागी होणार असून उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे नोकरीची संधी मिळणार आहे. इच्छुक उमेदवारांनी रिक्त पदांची सविस्तर माहिती व अर्ज करण्यासाठी ्र.ॲक्षसरॲ.ारहरिुरा.र्सी.ळपत्र या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच मेळाव्यास उपस्थित राहताना सर्व शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकित प्रती व किमान ५ बायोडेटा सोबत आणणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पुणे, ४८१ रास्ता पेठ, पुणे येथे संपर्क साधावा किंवा दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१३३६०६ वर संपर्क साधावा. बेरोजगार उमेदवारांसाठी ही एक सुवर्णसंधी असून जास्तीत जास्त युवकांनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन राजेश धर्माधिकारी, कौशल्य, विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी यांनी केले आहे.

# शिरुरला भारनियमनाविरोधात भूमिपुत्र प्रतिष्ठानचे बेमुदत धरणे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** शिरूर शहर व ग्रामीण परिसरात होणाऱ्या मोठ्या प्रमाणात भारनियमनाविरोधात वारंवार निवेदन देऊन देखील कुठलीही सुधारणा होत नसल्याने महावितरण प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी भूमिपुत्र प्रतिष्ठानच्यावतीने आज शुक्रवार दि.१७ एप्रिल पासून शिरूर महावितरण कार्यालयाबाहेर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करत असून तसे निवेदन शिरूर महावितरणचे उपकार्यकारी अभियंता शरद माने यांना देण्यात आले असल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुशांत कुटे यांनी सांगितले. शहर व परिसरामध्ये अनेक महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.यासंदर्भात मागील महिन्यात महावितरणला निवेदन देऊन शहर व परिसरामध्ये होत असलेल्या भारनियमनाबाबत भूमिपुत्र प्रतिष्ठानच्यावतीने केलेल्या सर्वेक्षणात एका दिवसात वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण किमान ४ ते ५ वेळा असून अर्धा तास ते ३ तासापर्यंत वीजपुरवठा खंडित होत असल्याचे निदर्शनास आले असल्याचे कुटे यांनी सांगितले.

# शिरूरमध्ये मेफेड्रोन विक्रीप्रकरणी अल्पवयीन ताब्यात

## चार दिवसांत दुसरी कारवाई



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** शिरूर शहर व परिसरात अमली पदार्थांविरोधात पोलिसांनी कारवाईची मोहीम तीव्र केली असून मेफेड्रोन (एमडी) या अमली पदार्थाची विक्री करणाऱ्या एका विधिसंघर्षित बालकास स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण यांनी ताब्यात घेतले आहे. गेल्या चार दिवसांत अमली पदार्थांविरोधातील ही दुसरी मोठी कारवाई ठरली आहे.

दि. ११ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शिरूर उपविभागात गुन्हे नियंत्रण व अमली पदार्थविरोधी मोहीम राबवत होते. यावेळी पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, एक अल्पवयीन मुलगा शिरूर बायपास येथील बंद पडलेल्या नाना स्पॉट हॉटेल परिसरात मेफेड्रोन विक्रीसाठी येणार आहे. मिळालेल्या माहितीची खातरजमा करून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर पोलीस ठाण्याच्या मदतीने संबंधित ठिकाणी सापळा रचण्यात आला.

पोलिसांनी केलेल्या कारवाईत संशयित बालकास ताब्यात घेऊन त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून सुमारे १ लाख ३८ हजार ८०० रुपये किमतीचा ६.९४ ग्रॅम वजनाचा मेफेड्रोन (एमडी) हा अमली पदार्थ जप्त करण्यात आला. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात एनडीपीएस ॲक्ट कलम ८(क), २१(ब) तसेच बीएनएस कलम ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास गुन्हे अन्वेषण शाखा, पुणे ग्रामीण आणि शिरूर पोलीस करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व शिरूर पोलीस ठाण्याच्या पथकाने संयुक्तपणे केली.

# मोकळा कांदा लिलावासाठी शेतकरी प्रतिक्षेत

## व्यापारी उत्सुक नसल्याने, बाजार समिती्कडून दिरंगाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव :** व्यापाऱ्यांना पडतळ बसत नसल्याने लुज कांदा लिलाव सुरू करण्यास व्यापारी उत्सुक नाही तर तमाम शेतकरी कधी लिलाव सुरू होणार या प्रतीक्षेत असताना , शेतकरी हिताच्या निर्णयापेक्षा व्यापारी हित जोपासणारी श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समिती श्रीरामपूर व टाकळीभान येथील मोकळा कांदा लिलाव सुरू करत नसल्याचा आरोप शेतकरी संघटना स्वतंत्र भारत पक्षाचे निलेश शेंडगे यांनी एका निवेदनाद्वारे केला आहे.

या निवेदनात शेडगे यांनी पुढे म्हटले आहे की शेतकऱ्यांनी शेतात काबाडकष्ट करून पिकविलेल्या शेतमालाला किफायतशीर योग्य मोबदला मिळावा यासाठी राज्यात सहकाराचे माध्यमातून तालुका स्तरावर कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना करण्यात आली आहे.मात्र श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समिती शेतकऱ्यांचे हिताचा विचार न करता व्यापारी हिताचा निर्णय करत असल्याने मुख्य बाजार आवारातील,व टाकळीभान येथील लुज कांदा मार्केट सुरू करण्यात दिरंगाई करत आहे. याबाबत शेतकरी व आम्ही संघटनेचे कार्यकर्ते वेळोवेळी सभापती व सचिव या जबाबदार व्यक्तीकडे विचारपूस करतो. मात्र संचालक मंडळाची बैठक झाली की मोकळा कांदा लिलाव सुरू होतील. टाकळीभान ऊप आवारात काँक्रीटचे काम सुरू आहे . पीसीसी कॉक्रीट काम सुकले की चार पाच दिवसात सुरू होईल असे सांगतात. शेतकरी प्रतिक्षेत असताना, व्यापारी का? नाही कारण व्यापाऱ्यांना कांदा गोणी लिलावात बऱ्यापैकी पडतळ बसत असल्याने त्यांचे चक्र सुरळीत सुरू आहे. तातडीने ट्रॅक्टरने मोकळा कांदा विकून शेतातील काढणी मजुरांचे पैसे शेतकरी देत असतो. आज रोजी मजुराची मजुरी देण्याची पंचाईत असून महागड्या मोकळ्या गोण्यास पैसे कुठून आणणार? मोकळ्या कांदा लिलावात श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समिती पदाधिकारी शेतकऱ्यांचे हित न जोपासता व्यापारी हित जोपासत असल्याचे सिद्ध होत आहे.

श्रीरामपूर बाजार समितीने चार दिवसांत मोकळा कांदा लिलाव सुरू केले नाही तर आंदोलन करण्याचा इशारा पत्रकाचे शेवटी नीलेश शेडगे यांनी दिला आहे.

# जेजुरीत महामानवाला अभिवादन

## उत्साही वातावरणात डॉ.बाबासाहेबांची १३५ वी जयंती साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी :** महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विद्यानगर येथील ग्रीन पार्क सोसायटीमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात हा जयंती उत्सव संपन्न झाला.कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेबांच्या विचारांचे समाजातील महत्त्व, शिक्षणाचे सामर्थ्य आणि सामाजिक समतेचा संदेश आपल्या मनोगतातून मांडला.

या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई, खाटीक समाज प्रदेशाध्यक्ष मनीष उर्फ बंटी शेठ निकुडे पाटील, भारतीय जनता पार्टी पुणे जिल्हा चिटणीस गणेश भोसले, जेजुरी नगरपरिषद नगरसेवक योगेश जगताप, नगरसेविका भक्ती कोरपड तसेच उद्योजक अमोल जगताप उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी बाबासाहेबांच्या कार्याला अभिवादन करत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

जयंतीनिमित्त सोसायटीतील युवक व बालकांनी विविध भाषणे, देशभक्तीपर गीते आणि सांस्कृतिक कलाविष्कार सादर केले. या माध्यमातून महामानवाच्या जीवनप्रवासाला उजाळा देण्यात आला. समाजातील वंचित घटकांसाठी कार्य करण्याचा आणि बाबासाहेबांचे विचार घराघरात पोहोचवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन चंद्रकांत जगताप, प्रशांत सरवदे, रमेश पागे, बालासाहेब बनसोडे, संजय बनसोडे, राहुल भालेराव, सनी झगडे, सुनील वाघ, योगेश बारभाई आणि सर्व कुलस्वामिनी नवरात्र उत्सव मंडळाच्या सदस्यांनी केले होते. सामाजिक बांधिलकी आणि एकजुटीच्या भावनेतून हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. 'जय भीम'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.



# द•ख•ल

## विद्या प्रतिष्ठान सोमेश्वर इंग्लिश मीडियम स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के

**सोमेश्वरनगर -** बारामती तालुक्यातील विद्या प्रतिष्ठान संचलित विद्या प्रतिष्ठान सोमेश्वर इंग्लिश मीडियम स्कूल. (उइडए) चा इयत्ता दहावी (अखडडए २०२५-२६) चा निकाल १०० टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन केले आहे. एकूण ६६ विद्यार्थ्यांनी परीक्षेला बसून सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.या निकालात ८ विद्यार्थ्यांनी ९५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत विशेष प्राविण्य मिळवले आहे, तर ९ विद्यार्थ्यांनी ९० ते ९५ टक्के, २५ विद्यार्थ्यांनी ८० ते ८९ टक्के आणि २० विद्यार्थ्यांनी ७० ते ७९ टक्के गुण मिळवले आहेत. ४ विद्यार्थ्यांनी ६० ते ६९ टक्के गुण मिळवले आहेत. या परीक्षेत आदिश्री गणेश हिरवे हिने ९८.०० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. स्वराज महेश काकडे (९७.६० टक्के) याने द्वितीय, तर वेदिका अंकुश तावरे (९६.४० टक्के) हिने तृतीय क्रमांक मिळवला. विषयानुसार इंग्रजी, मराठी व आयटी विषयात अनेक विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. हिंदी विषयात स्वराज काकडे (९८), विज्ञान विषयात स्वराज काकडे (९९), तर समाजशास्त्र विषयात स्वराज काकडे व आदिश्री हिरावे यांनी प्रत्येकी ९६ गुण मिळवले आहेत. या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य सचिन पाठक यांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व पालकांचे अभिनंदन करून सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




## इंद्रायणीनगर परिसरातील उघड्या विहिरींवर संरक्षक जाळी

**आळंदी :** शहरातील इंद्रायणीनगर परिसरात उघड्या अवस्थेत असलेल्या विहिरींमुळे अपघाताचा धोका निर्माण झाला होता. भाविक, पर्यटक, लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. या पार्श्वभूमीवर उपनगराध्यक्षा सुजाताताई तापकीर आणि सभागृह नेते सचिन गिलबिले यांनी तातडीने पुढाकार घेत प्रशासनाकडे पाठपुरावा केला. नगराध्यक्ष प्रशांत कुर्हाडे आणि मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्याकडे लेखी मागणी सादर करत उघड्या विहिरींवर संरक्षक जाळी बसविण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत नगरपरिषद प्रशासनाने त्वरित कारवाई करत धोकादायक ठिकाणांवरील विहिरींवर मजबूत संरक्षक जाळी बसवली आहे. या उपाययोजनेमुळे संभाव्य अपघात टळण्यास मोठी मदत होणार असून परिसरातील नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत प्रशासनाने घेतलेला हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे मत स्थानिकांनी व्यक्त केले. भविष्यातही अशा सुरक्षाविषयक प्रश्नांवर तत्परतेने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.



## प्रवचन सेवेचे मानधन इंद्रायणी स्वच्छता अभियानाला अर्पण

**आळंदी :** इंद्रायणी नदी स्वच्छ व प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी आळंदी नगरपरिषदेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'इंद्रायणी स्वच्छता अभियानाला' नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. समाजातील विविध स्तरांतून मिळणाऱ्या सहकार्यामुळे या उपक्रमाला बळ मिळत असून, गुरुवारी एका उल्लेखनीय कृतीने सर्वांचे लक्ष वेधले. पवित्र इंद्रायणी तीरावर कै.सुरेश दिवाकर व कै.मुक्ताबाई निकम यांचा दशक्रिया विधी पार पडला. यावेळी श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे विश्वस्त ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील यांनी प्रवचन सेवेच्या माध्यमातून उपस्थितांना मार्गदर्शन केले. या प्रवचनासाठी देण्यात आलेले ७००० रुपयांचे मानधन न स्वीकारता त्यांनी ती रक्कम 'इंद्रायणी स्वच्छता अभियानासाठी' आळंदी नगरपरिषदेकडे सुपूर्द केली.या देणगीमुळे स्वच्छता अभियानाला आर्थिक बळ मिळणार असून, नदी व परिसर स्वच्छतेच्या कामांना गती येणार आहे. आळंदी नगरपरिषदेच्या वतीने या सामाजिक जाणीवेच्या कृतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे पाटील म्हणाले की, इंद्रायणी नदी ही आळंदीची ओळख असून तिची स्वच्छता राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. नागरिकांकडून मिळणारे सहकार्य प्रेरणादायी असून, अशा देणग्यांमुळे इतरांनाही या अभियानात सहभागी होण्याची प्रेरणा मिळत आहे. दरम्यान, शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

# भव्य स्वच्छता महाअभियानाने सासवड शहरात स्वच्छतेचा संदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सासवड नगरपरिषदेच्या वतीने रविवारी भव्य स्वच्छता महाअभियान राबविण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळी सासवड–सोनेरी मार्गावर मोहिमेची सुरुवात करण्यात आली. नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी श्रमदान करत शहरातील विविध भाग स्वच्छ केले. अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे हटविण्यात आले.

घंटागाड्या, ट्रॅक्टर, जेसीबी यांच्या सहाय्याने प्लास्टिक व इतर कचऱ्याचे संकलन करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. आरोग्य विभागाने परिसर निर्जंतुक करण्यावर विशेष भर दिला. या मोहिमेत संजय जगताप, आनंदी जगताप, मनोहर जगताप, डॉ. कैलास चव्हाण, राजन जगताप, मारुती भोंडे यांच्यासह लोकप्रतिनिधी व नागरिक सहभागी झाले.

नगराध्यक्षा आनंदी जगताप यांनी स्वच्छतेत अव्वल स्थान टिकवण्यासाठी नागरिकांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी अशा मोहिमा राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी कचरा व्यवस्थापनाचे नियम पाळण्याचे आवाहन करत नियमभंग करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा दिला.

या अभियानातून स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली असून सासवड शहर स्वच्छ व सुंदर राखण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.




**सासवड नगरपरिषदेच्या स्वच्छता महाअभियानाच्या प्रारंभी माजी आमदार संजय जगताप, नगराध्यक्षा आनंदी जगताप, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, आरोग्य सभापती राजन जगताप, माजी नगराध्यक्ष मारुती भोंडे यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी, अधिकारी व नागरिकांनी हातात झाडू घेऊन श्रमदान करत स्वच्छतेचा संदेश दिला.**

# प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजनेच्या माध्यमातून महिलांना दिलासा

## जिल्ह्यात ३२ हजाराहून अधिक नवीन लाभार्थ्यांची नोंदणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाच्यावतीने प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजनेच्या संकेतस्थळावर नवीन ३२ हजार ६४६ लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली आहे, यामुळे गर्भवती महिलांना मोठा दिलासा मिळाला असून योजनेचा लाभ अधिकाधिक पात्र महिलांपर्यंत पोहोचविण्याच्यादृष्टीने हे पाऊल महत्त्वपूर्ण ठरले आहे.



जिल्ह्यातील ग्रामीण भागात ४ हजार ३९५ व नागरी भागात १ हजार ६९९ असे एकुण ६ हजार ९४ अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत. पुणे महानगरपालिकेअंतर्गत १० हजार ३४, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका ३ हजार ७१०, आंबेगाव तालुक्यात ९५२ ,बारामती १ हजार ७५५, भोर ५२३, दौंड १ हजार ५१४, हवेली २ हजार ५५, इंदापूर १ हजार ४९४, जुन्नर १ हजार ६६१, खेड २ हजार ६४, मावळ १ हजार ७१२, मुळशी ७८८, पुरंदर ८८४, शिरुर १ हजार ९२६ आणि वेल्हे तालुक्यात १२४ तसेच शहरी भागात १ हजा ४५० याप्रमाणे नवीन ३२ हजार ६४६ लाभार्थ्यांची नोंद करण्यात आली आहे.

पीएमएमव्हीवाय गरोदर महिलांना गरोदरपणाच्या काळात त्यांचा आहार व आरोग्य चांगले राहावे व गरोदरपणाच्या कालावधीत त्यांनी मंजुरी करू नये तसेच मुलींच्या जन्मास प्रोत्साहन मिळावे याकरता केंद्र शासनामार्फत प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना राबविण्यात येते. सन २०१७ पासून प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना ही आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत होती.योजना महाराष्ट्रात जून-२०२५ पासून एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महिला व बाल कल्याण विभागामार्फत राबविण्यात येत आहे.

**योजनेचे निकष :**

१८ वर्षे ७ महिने ते वयाच्या ५५ व्या वर्षाच्या दरम्यान गरोदर होणाऱ्या महिलां या योजनेसाठी पात्र असतात.पहिल्या आपत्यासाठी मुलगा असो व मुलगी तसेच दुसरे अपत्य फक्त मुलगी असल्यास लाभ देय आहे. केंद्र व राज्य शासन,सार्वजनिक उपक्रम अंतर्गत नोकरीवरील महिलांना योजनेचा लाभ देय नाही.योजनाचा लाभ घेण्याकरिता पुढील १० पैकी कोणतेही एक ओळखपत्र असणे अनिवार्य आहे. यामध्ये ज्या महिलांचे निव्वळ कौटुंबिक उत्पन्न प्रतिवर्ष ८ लाखापेक्षा कमी आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या महिला, ४० टक्के व अधिक अपंगत्व असणा-या (दिव्यांग जन) महिला, बीपीएल शिधापत्रिकाधारक महिला, आयुष्यमान भारत अंतर्गत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनाअंतर्गत महिला लाभार्थी, ई-श्रम कार्डधारक महिला, किसान सन्मान निधी अंतर्गत लाभार्थी महिला शेतकरी, मनरेगा जॉब कार्ड धारक महिला, गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, आशा कार्यकर्ती अन्न सुरक्षा कायदा, २०१३ अंतर्गत रेशनकार्डधारक महिला लाभार्थी पात्र आहे.

पहिल्या अपत्यासाठी गरोदरपणांची नोंदणी केल्यांनतर ३ हजार रुपये, बाळाच्या जन्माची नोंदणी केल्यानंतर २ हजार रुपये तसेच दुसऱ्या अपत्यासाठी (फक्त मुलगी असल्यास) गरोदरपणाची नोंदणी अनिवार्य असून बाळाचे जन्मप्रमाणपत्र सादर केल्यास ६ हजार रुपयाचा लाभ मिळतो. योजनेचे लाभ थेट लाभ हस्तांतरणपद्धतीने लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येतो. अंगणवाडी सेविकेला प्रोत्साहान भत्ता म्हणून प्रति लाभार्थी रक्कम रुपये २५० रुपये मिळते.

या योजनेचा लाभ घेण्याकरिता नजीकच्या अंगणवाडी केंद्रात अंगणवाडी सेविकांकडे जाऊन आवश्यक कागदपत्र जमा करावे. तसेच लाभार्थी स्वतः ु.ग्रिीं ुलव.र्सी. ळप या संकेतस्थळावर ऑनलाइनपद्धतीने अर्ज करू शकतात.

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील तसेच महिला बालकल्याण सभापती अंकिता पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी गजानन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन लाभार्थ्यांच्या नोंदीचे काम सध्या प्रगतीपथावर सुरू असून उर्वरित पात्र महिलांची नोंदणी लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व पात्र महिलांना योजनेचा लाभ मिळावा, हा उद्देश साध्य करण्यासाठी विभागाकडून नियोजनबद्ध कार्यवाही करण्यात येत आहे.

**आनंद खंडागळे जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास)**

कर्जत-जामखेड मतदारसंघात

# २ लाख ७३ हजार मतदारांची एसआयआर प्रक्रिया पूर्ण

## ७८ हजारांवर मतदार अजूनही वंचित; प्रांताधिकारी पाटील यांनी घेतला दोन्ही तालुक्याचा आढावा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**कर्जत :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २२७ कर्जत-जामखेड विधानसभा मतदार संघात विशेष पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात आला असून गुरुवार, दि १६ रोजी प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी आढावा घेतला. यात कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघात ३५६ मतदान केंद्रातील ३ लाख ५१ हजार ६७१ मतदारांपैकी २ लाख ७३ हजार ३२६ मतदारांचे एसआयआर प्रक्रिया पूर्ण झाली आहे. दोन्ही मतदारसंघाची ७७.७२ टक्के काम पूर्ण झाले आहे. तर अद्याप ७८ हजार ३४५ मतदारांची एसआयआर प्रक्रिया होणे बाकी आहे. तरी सर्व राजकीय पक्ष यासह सुज्ञ मतदारांनी यात १०० टक्के सहभाग घेत लोकशाही मजबूत करावी असे आवाहन प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी केले.

ज्या मतदारांची नावे सन २००२ च्या मतदार यादीत आहेत त्यांची नावे सन २०२४ च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या मतदारयादीत आहेत त्यांचे स्वयं पडताळणी आवश्यक आहे. तसेच ज्या मतदारांची नावे २००२ च्या यादीत नाहीत परंतु २०२४ च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या यादीत नाव आलेले आहे त्यांची पडताळणी करताना त्यांच्या वडिलांची माहिती सन २००२ च्या यादीतील (वडिलांचे विधानसभा मतदार संघ, यादी भाग क्रमांक व अनुक्रमांक) नमूद करून पडताळणी पार पडणार आहे. त्यामुळे विवाहित महिला/ सुन यांची पडताळणी करताना त्यांच्या वडिलांच्या विधानसभा मतदार संघ, यादी भाग क्रमांक व अनुक्रमांक माहिती बीएलओ यांनी प्राप्त केली. त्यानुसार मतदार यादी संक्षिप्त पुनरीक्षणाचे काम बिनचूक व तंतोतंत करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. मात्र कर्जत-जामखेड मतदारसंघातील आजमितीस ७८ हजार ३४५ मतदारांची एसआयआर प्रक्रिया बाकी असून गुरुवारी प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी कर्जत तहसील कार्यालयात सर्व राजकीय पक्ष, पदाधिकारी यांच्या प्रमुखांची बैठक बोलावली होती. मात्र त्यास देखील अल्प प्रतिसाद मिळाला. मोजकेच राजकीय पदाधिकारी यांनी बैठकीस हजेरी लावली. कर्जत तहसीलदार यांना ९४ हजार ३२४ मतदारांचे उद्दिष्टे दिले होते. त्यापैकी ७४ हजार २९० मतदारांनी माहिती पूर्ण झाली आहे. कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना १ लाख २४९ मतदारांपैकी ७७ हजार २९० तर नगरपंचायत मुख्याधिकारी कर्जत यांना १६ हजार ९९८ मतदारांपैकी ११ हजार १२८ मतदारांनी आपली एसआयआर प्रक्रिया पूर्ण केली आहे. यासह जामखेड तहसीलदार यांनी ५१ हजार ११ मतदारांपैकी ४३ हजार ६२, गटविकास अधिकारी जामखेड ५५ हजार ६८४ पैकी ४७ हजार २६३ आणि जामखेड नगरपरिषद मुख्याधिकारी यांनी ३३ हजार ४०५ मतदारांपैकी २० हजार २१७ मतदारांचे उद्दिष्टे पार केले आहेत. कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघातील ३५६ मतदान केंद्रातील ३ लाख ५१ हजार ६७१ मतदारांपैकी २ लाख ७३ हजार ३२६ मतदारांचे एसआयआर प्रक्रिया पूर्ण झाली आहे. दोन्ही मतदारसंघाची ७७.७२ टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित मतदारांनी देखील या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेत ही मतदार विशेष पुनरीक्षण कार्यक्रम १०० टक्के यशस्वी करण्याचे आवाहन प्रांताधिकारी पाटील यांनी केले.

### आढावा बैठकीस मोजके पदाधिकारी उपस्थित, महत्वाच्या राजकीय पक्षाची बैठकीकडे पाठ

गुरुवारी प्रांताधिकारी कर्जत नितीन पाटील, तहसीलदार रवी सतवन, निवडणूक विभागाचे योगेश जाधव यांनी एसआयआर मतदार पुनर्निरीक्षण आढावा आणि त्याची माहिती उपलब्ध व्हावी यासाठी सर्वच राजकीय पक्षांना उपस्थित राहण्यासंबंधी सूचना दिल्या होत्या. मात्र या बैठकीस शिवसेना शिंदे गटाचे डॉ नितीन तोरडमल, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे अड बाळासाहेब शिंदे, आरपीआयचे संजय भैलुमे उपस्थित होते. भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार, राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना उबाठा या महत्वाच्या पक्षांसह इतर राजकीय पदाधिकाऱ्यांनी आणि कर्जतच्या नगरसेवकांनी देखील बैठकीस अनुपस्थिती लावली.

# जि.प.कर्मचारी २१ तारखेच्या आंदोलनात सहभागी होणार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**अहिल्यानगर :** महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियनचे राज्याचे नूतन अध्यक्ष मा. श्री. बाबुरावजी पुजरवाड साहेब यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा परिषदेत जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या अडी-अडचणी समजून घेण्यासाठी बैठक आयोजित केली होती, यामध्ये मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता. प्रामुख्याने, जुनी पेन्शन योजना लागू करणे, बदल्यांमध्ये संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना सूट देणे, महिला बाल कल्याण विभागाकडील नवीन आकृतीबंधानुसार येणाऱ्या बदल्यांमध्ये या सुधारीत पदावर पदस्थापना देणे, लिपीकांची वेतनत्रुटी दूर करणे, कनिष्ठ आणि वरिष्ठ सहाय्यक ही दोन्ही पदे एकत्र करून त्यांची वेतनश्रेणी सुधारीत करणे, महिला कर्मचाऱ्यांना उशीरापर्यंत कार्यालयात थांबवू नये अथवा सुट्टीच्या दिवशी कामावर बोलावू नये, मा. हायकोर्टाच्या निर्देशानुसार आगावू वेतनवाढीचा लाभ देणे, सेवानिवृत्ती वेतनप्रकरणे तातडीने मंजूर करणे, राज्य शासनाच्या धर्तीवर मॅटची सुविधा जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना लागू करणे, या आणि अशा अनेक विषयांवर बाबुरावजी पुजरवाड यांच्या सोबत चर्चा झाली.

बाबुरावजी पुजरवाड यांनी या मागण्यांच्या अनुषंगाने शासनास येत्या २१ तारखेला जिल्हा परिषद कर्मचारी संपावर जाणार असल्याची नोटीस दिल्याचे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना अवगत केले. त्याचप्रमाणे, कनिष्ठ आणि वरिष्ठ सहाय्यक ही दोन्ही पदे एकत्र करून त्यांची वेतनश्रेणी सुधारीत करणेबाबत शासनस्तरावर पाठपुरावा चालू असल्याचे सांगितले. तसेच आगामी काळात जिल्हा परिषद स्तरावर सर्व संघटनांनी एकसंघ राहून, जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडविण्यास प्राधान्य देणेबाबत जिल्हा शाखेस निर्देश दिले आहेत.

आजच्या बैठकीत राज्याचे उपाध्यक्ष सुभाष कराळे, राज्यसमन्वयक मल्हारी कचरे, लेखा संघटनेचे राधेश्याम सपकाळे, जिल्हाध्यक्ष अभय गट, जिल्हा परिषद पतसंस्थेचे चेअरमन संजयजी कडूस, राज्य समन्वयक विकास साळुंके, लेखा संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के, माजी अध्यक्ष विजयकुमार कोरडे, आरोग्य संघटनेचे जिल्हाध्यक्ष गोरक्ष शेळके, परीचर संघटनेचे जिल्हाध्यक्ष निलेशजी गाडेकर, युनियनचे कार्याध्यक्ष कैलासजी भडके, राज्य कार्यकारिणीचे सदस्य शशिकांत रासकर, विलास वाघ, संचालक प्रशांत मोरे, सहाय्यक प्रशासन अधिकारी हेमंत कुलकर्णी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी अरुण माळी, ज्ञानेश्वर बोरुड, नाना हांबर्डे, नारायण येवले, महिंद्रा आंधळे, अनिल येनगंदुल, राहुल ठोकळ,महिला कर्मचारी कविता शिंदे, संगिता बनकर, पल्लवी डोंगरे, रेश्मा धुमाळ, जयश्री पवार, विजया गायकवाड, विद्या झरेकर शेपाळ मॅडम परिचर संघटनेच्या जाधव मॅडम आणि कर्मचारी बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नियमबाह्य गॅस गोडाऊनचा धोका

# विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांच्या जीविताचा प्रश्न ऐरणीवर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** कर्जत तालुक्यातील मौजे राशीन येथे इंडियन गॅसच्या ग्रामीण वितरकांकडून करण्यात येणाऱ्या नियमबाह्य गॅस गोडाऊन व वाहतूक व्यवस्थेमुळे स्थानिक ग्रामस्थांसह जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला असल्याची तक्रार बहुजन समाज पार्टीच्या वतीने करण्यात आली आहे.

संबंधित गॅस वितरकाचा परवाना तात्काळ रद्द करून कठोर कारवाई करावी, अन्यथा २० एप्रिलपासून मुंबई येथील इंडियन ऑईल भवन, बांद्रा कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

कर्जत तालुक्यातील राशीन येथील इंडियन गॅसच्या वितरकांकडून मोठ्या प्रमाणात गॅस वितरण केले जाते. मात्र, या वितरकाने शासनाच्या नियमांचे उल्लंघन करत जिल्हा परिषद शाळेच्या भिंतीलगत मोठ्या प्रमाणावर गॅस टाक्यांचा साठा केल्याचा आरोप आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, प्रशासनातील काही अधिकाऱ्यांशी आर्थिक हितसंबंध जोपासून हे सर्व प्रकार सुरू असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

विशेष म्हणजे, महाराष्ट्रातील काळुबाई देवस्थान परिसरात पूर्वी झालेल्या गॅस स्फोटाच्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी बहुजन समाज पार्टीचे जिल्हा प्रभारी दत्तात्रय आत्माराम सोनवणे यांनी यापूर्वीही तक्रार केली होती.

ग्रामस्थांच्या आणि शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित करत त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता.

## महापुरुषांचा विचार 'इम्पा'ने जपला : प्रा.खरसडे

**लिंपणगाव** : इम्पा संघटना ( इंडियन मेडिकल प्रोफेशनल असोसिएशन दिल्ली) या राष्ट्रीय संघटनेच्या श्रीगोंदा तालुका शाखा आयोजित नुतन कार्यकारिणी पदग्रहण समारंभ व महात्मा जोतीराव फुले तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (गुरु-शिष्य) यांचा संयुक्त जयंती सोहळा, दि.१४ एप्रिल २०२६ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत काष्टी येथे संपन्न झाला.

सायंकाळी काष्टी मध्ये राजनंदीनी हॉलमध्ये झालेल्या भव्य दिव्य कार्यक्रमात वैद्यकिय क्षेत्रातील समर्पण, कौशल्य, रुग्णकेंद्रित वृत्ती व सामाजिक बांधिलकी याबद्दल इम्पा जीवनगौरव पुरस्कार २०२६ व सन्मानचिन्ह दौंड येथील प्रसिध्द नेत्ररोग तज्ज्ञ गुरुवर्य डॉ.प्रेमकुमार भट्टड व श्रीगोंदा मेडिकल असोसिएशनचे जेष्ठ सदस्य व मार्गदर्शक नामवंत डॉ. संजीव कथुरिया यांना मान्यवरांकडून प्रदान करण्यात आला.

यावेळी इम्पा संघटनेचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल कोकाटे व डॉ.राजेश पाखरे तसेच दौंड मेडिकल असोसिएशनचे सचिव डॉ. मुकुंद दादा भोर, दौंड निमा संघटनेचे अध्यक्ष डॉ. विशाल मिसाळ, दौंड मेडिकल असोसिएशन / रोटरी क्लब ऑफ दौंडचे माजी अध्यक्ष डॉ. राजेश दाते, दौंड डठझक्र ग्रूपचे वैद्यकीय अधिकारी डॉ.नितीन भोसले , श्रीगोंदा होमिओपॅथिक संघटनेच्या नवनिर्वाचित अध्यक्षपदी डॉ. सौ.मीनाक्षी मोटे यांची निवड झाल्याबद्दल, चि.समर्थ चंद्रकांत राहिंज याची तेंग सुडो शालेय क्रिडा स्पर्धेत नॅशनल स्तरावर निवड झाल्याबद्दल इम्पा संघटनेच्या वतीने सन्मान करण्यात आला.

# आ.दातेंच्या हस्ते बांधकाम कामगारांना प्रमाणपत्र वाटप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**पारनेर :** नगर विधानसभा मतदारसंघातील कष्टकरी बांधकाम कामगारांच्या हक्कांना बळ देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आज पार पडला.

आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते पारनेर तालुक्यातील पाचशेहून अधिक बांधकाम कामगारांना अधिकृत बांधकाम कामगार प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा थेट लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

याप्रसंगी आमदार दाते यांनी सांगितले की, बांधकाम कामगार हा विकासाचा खरा शिल्पकार आहे. त्याच्या कष्टाचा सन्मान होणे ही शासनाची आणि समाजाची जबाबदारी आहे. शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक कामगारापर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. तसेच मतदारसंघातील बांधकाम कामगारांना या योजना प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या राज्य शासनाचे त्यांनी मनापासून अभिनंदन केले. यामध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, संबंधित विभागाचे मंत्री आकाश फुंडकर तसेच अहील्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.या कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला उपाध्यक्षा जयश्री शिंदे यांसह विविध मान्यवर उपस्थित होते.

मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या बांधकाम कामगारांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले. हा उपक्रम म्हणजे केवळ प्रमाणपत्र वाटप नसून, कष्टकरी कामगारांच्या सन्मानाचा आणि त्यांच्या हक्कांच्या जाणीवेचा एक महत्त्वाचा टप्पा ठरत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

कुकडीचे उन्हाळी हंगामाचे पहिले आवर्तन न मिळाल्याने

# पाणी वापर संस्था व शेतकरी आक्रमक!

## शासकीय विश्रामगृहावर पत्रकार परिषदेत शेतकऱ्यांचा अधिकारी, लोकप्रतिनिधी व पालकमत्र्यांवर हल्लाबोल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव** : श्रीगोंदा तालुक्यात कुकडीचे उन्हाळी हंगामाचे पहिलेच आवर्तन सोडले, परंतु या पाण्याचे अधिकाऱ्यांनी घोडेबाजार केला. शेततळ्यांना पाणी विकले म्हणून शेतकरी पाण्यापासून वंचित राहिल्याचा आरोप कुकडीच्या शेतकऱ्यांमधून केला जात आहे. त्यामुळे १३२ मायनर अंतर्गत शेतकऱ्यांना अपुरे पाणी सोडून शेतकऱ्यांच्या कुकडीच्या कार्यकारी अभियंता व उपविभागीय अधिकारी यांनी तोंडाला पाणी पुसले. या अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे १३२ मायनर अंतर्गत असणाऱ्या पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी व शेतकऱ्यांची श्रीगोंदा येथील शासकीय विश्रामगृह कुकडी सिंचन अधिकाऱ्यांच्या विरोधात पुढील दिशा ठरवण्यासाठी बैठक पार पडली. या बैठकीत तालुक्याचे लोकप्रतिनिधी, पालकमंत्री यांच्या अक्षम्य दुर्लक्षमुळे श्रीगोंदेकराना कुकडीचे उन्हाळी हंगामातील पहिलेच आवर्तन हे शेतकऱ्यांचे फक्त पाठ ओले करून पाणी बंद करण्यात आले. त्यामुळे कुकडी लाभक्षेत्रात शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण पसरले असून, याप्रकरणी तालुक्याचे लोकप्रतिनिधी व पालकमंत्री यांना संस्थांच्या पदाधिकारी व शेतकऱ्यांनी या बैठकीत खडे बोल सुनावले आहेत.

दरम्यान गुरुवारी सकाळी दहा वाजता शासकीय विश्रामगृहावर आयोजित बैठकीस कुकडीच्या आवर्तनाच्या पार्श्वभूमीवर १३२ मायनर अंतर्गत असणाऱ्या १६ पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी व वंचित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत शेतकऱ्यांनी तालुक्याचे लोकप्रतिनिधी व पालकमंत्री हे आवर्तन काळात पूर्ण डोळ्यावर पट्टी बांधून बसले. त्यामुळे अधिकाऱ्यांवरचे नियंत्रण सुटले असून अधिकाऱ्यांनी त्याचा फायदा घेतला. आणि उन्हाळी हंगामात शेतकऱ्यांना आवर्तनापासून दूर ठेवले. असा आरोप यावेळी उपस्थित पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी व शेतकऱ्यांनी केला आहे. या वंचित शेतकऱ्यांचे नेतृत्व शिवाजीराव राऊत यांनी केले.

यावेळी श्री राऊत यांनी लोकप्रतिनिधींवर तोफ डागताना म्हणाले की, उन्हाची तीव्रता अत्यंत गंभीर असताना कुकडी लाभक्षेत्रात शेतकऱ्यांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध राहिले नाही, फळबागा डोळ्यादेखत जळून चालले आहेत. आवर्तन सुटले परंतु अधिकाऱ्यांनी नियोजन ठेवले नाही. त्यामुळे पाणी उशाला मात्र कोरड घशाला अशी अवस्था उन्हाळी हंगामातील पहिल्याच आवर्तनात कुकडी लाभ क्षेत्रात निर्माण झाली. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या बैठकीत श्री राऊत यांनी शेतकऱ्यांच्या वतीने जवळपास आठ मागण्या केल्या आहेत.

दरम्यान या महात्मा फुले पाणी वापर संस्था यांच्या म्हणण्यानुसार १३२ मायनर कालव्यावर एकूण ४५० अनधिकृत उचल पाईप आहेत. याचा महसूल कागदोपत्रे खात्याकडे कुठेच महसूल जमा नाही.

प्रथम पाईप दहा हजार प्रमाणे ४५ लाख रुपये अवैध महसूल जमा होतो. या घटनेला पाटबंधारे खातेच जबाबदार आहे. पाणी विकायचे मात्र पाणीपट्टी पाणी वापर संस्थेच्या नावे टाकली जात आहे. याची सखोल चौकशी झाली पाहिजे, यापुढे आवर्तन कालावधीत पाणी संस्थेला पाणी गेज नुसार मिळावे, मागणीनुसार पाणी मोजून देण्यात यावे, अशा मागण्या यावेळी शेतकऱ्यांनी या आयोजित बैठकीत मांडल्या. त्यामुळे आता दुसऱ्या सुटणाऱ्या कुकडीच्या आवर्तनात कुकडीच्या अधिकाऱ्यांनी दिरंगाई केल्यास या लाभक्षेत्रातील पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी व शेतकरी श्रीगोंदा येथील कुकडी कार्यालयासमोर तीव्र आमरण उपोषण करणार असल्याचे शेतकरी नेते शिवाजीराव राऊत यांनी केले आहे. या बैठकीस घारगाव मढेवडगाव बाबुर्डी लिंपणगाव पारगाव सुद्रिक श्रीगोंदा चोराचीवाडी येथील पाणी वापर संस्थेचे पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

द•ख•ल

## डॉ. बाळासाहेब विखे पाटील सीबीएसई स्कूलचे दैदिप्यमान यश

शेवगाव : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या दहावीच्या परीक्षेचा निकाल . नुकताच जाहीर झाला असून, प्रवरा मेडिकल ट्रस्टचे डॉ. बाळासाहेब विखे पाटील सी.बी.एस.ई. स्कूल, शेवगांवने यंदाही उत्कृष्ट कामगिरी करत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. एकूण ६९ विद्यार्थी या परीक्षेला बसले होते. १२ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तसेच २२ विद्यार्थ्यांनी ८० ते ९०टक्क्यांच्या दरम्यान गुण मिळवले आहेत. याशिवाय १७ विद्यार्थी ७० ते ८० टक्के, १२ विद्यार्थी ६० ते ७० टक्के या गटात असून ८ विद्यार्थ्यांनी ६० टक्क्यांखाली गुण मिळवले आहेत. प्रथम क्रमांक पुष्कर श्रीकांत दारोकर (९९.२%) द्वितीय क्रमांक कु.नमस्वी मधुसूदन राठी (९९.०%) तृतीय क्रमांक अनुजा अरुण जाधव (९७.०% या यशाबद्दल प्रवरा मेडिकल ट्रस्टचे अध्यक्ष मा. डॉ. राजेंद्र विखे पाटील शेवगांवच्या सहसचिव मा. मोनिकाताई सावंत, प्रवरा शैक्षणिक समूह शेवगांवचे कार्यकारी संचालक मा. पंजाबराव आहेर पाटील, शाळेच्या प्राचार्या वर्षा दारकुंडे आणि उपप्राचार्य विजय चन्ने, शेवगांव इंग्लिश मीडियम स्कूलचे उपप्राचार्य मा. श्री. रमेश कवडेयांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## आंबेडकरांच्या जयंतीतून 'ज्ञानाचा जागर'!



**अहिल्यानगर** : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अहिल्यानगरमध्ये केवळ जल्लोष न करता, त्यांच्या शिक्षण या मूलभूत विचाराचा प्रसार करण्यासाठी एक आगळावेगळा उपक्रम राबवण्यात आला.

गणेश केदारे आणि त्यांच्या मित्र परिवाराच्या वतीने यूपीएससी आणि एमपीएससी स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १४ एप्रिल रोजी न्यू आर्ट्स कॉलेज मैदानावर भव्य सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आले. गेल्या ५ ते ६ वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबवला जात असून, विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयीची आवड निर्माण करण्याचा यामागचा प्रमुख उद्देश आहे. बाबासाहेबांनी शिक्षणाला वाघिणीचे दूध म्हटले आहे. जयंतीच्या निमित्ताने हाच विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि त्यांना स्पर्धा परीक्षेची गोडी लागावी, यासाठी आम्ही सराव परीक्षा घेतो, असे केदारे मित्र परिवाराच्या वतीने सांगण्यात आले. या सराव परीक्षेला अहिल्यानगर शहरातील विविध स्पर्धा परीक्षा केंद्रांतील शेकडो विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमास लक्ष अॅकॅडमीचे मंगेश कवडे सर, जगदंब अॅकॅडमीचे मालोजी शिकारे, बी अँड डब्ल्यू अॅकॅडमीचे हर्षद वारे, पिंपळे अॅकॅडमीचे पिंपळे सर, राजमुद्रा अॅकॅडमीच्या पांडुळे मॅडम तसेच शिवरक्षक महाडिक मेजर यांचे मार्गदर्शन लाभले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सागर विहार कॉलनीमध्ये उत्साहात



**अहिल्यानगर** : सावेडी उपनगरातील कॉटेज कॉर्नर डॉन बास्को परिसरातील सागर विहार कॉलनी येथे सर्व महिलांनी एकत्रित येवून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी केली. कॉलनीतील सर्व महिलांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी शारदा सूर्यकांत नेटके, नंदा दत्तात्रय बगाडे, रेखा राजेंद्र मखरे, सोनाली सूर्यकांत वरकड, विद्या दीपक भोसले, सोनाली भाऊसाहेब काळोखे, मधुमती गणेश चौधरी, आशा संजय साळे, दिव्या गणेश सिरसाट, गौरी मदन जाधव, गायकवाड ताई, शिवानी नेटके, समृद्धी बोरुडे, वर्षा आसुदानी, राजेंद्र मखरे, गणेश चौधरी आदी महिलांसह परिसरातील बाळगोपाळ उपस्थित होते.

## रंगोत्सव चित्रकला स्पर्धेत नागवडे स्कूलचे यश

**लिंपणगाव** : रंगोत्सव सेलिब्रेशन आयोजित रंगोत्सव चित्रकला स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला. विविध वयोगटात संपन्न झालेल्या या स्पर्धेमध्ये तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान संचलित शिवाजीराव नागवडे डॅफोडील्स स्कूल व कौशल्यादेवी नागवडे इंग्लिश मेडियम स्कूलच्या बाल चित्रकारांनी सुरेख रंग संगती करून चित्रांना मनमोहक रूप देत बक्षिसांची लय लूट केली. स्पर्धेमध्ये एकूण ४० विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी केली.स्पर्धेमध्ये ए + श्रेणी मिळवून एक ते आठ क्रमांक पटकावून बक्षीसास पात्र ठरलेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे - स्वरा जामदार - मिनी प्रोजेक्टर, अंश ढवळे - क्रिकेट किट, आराध्या जगताप - हेडफोन, आनंदीता जाधव - स्विमिंग पूल किट, विहान गुणवरे - रोलर स्केट, आयुष परकाळे - फुटबॉल, तनिष्का खेतमाळीस - स्कूल बॅग, वेदांत गाडेकर - स्कूल बॅग. सर्व यशस्वी बालचित्रकारांना सरिता सुपेकर, सोनाली पिटेकर यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वीतांचे तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे, विश्वस्त अनुराधाताई नागवडे, निरीक्षक एस पी गोलांडे, मुख्याध्यापिका नीतू दुलानी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार, दि.१७ एप्रिल २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## दारूच्या व्यसनातून एकाची आत्महत्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**म्हैसगाव** : राहुरी तालुक्यातील म्हैसगाव येथील आग्रेवाडी परिसरात दारूच्या व्यसनातून एका व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. ज्ञानदेव चांगदेव गुलदगड (वय ५६) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गुलदगड यांना दारूचे तीव्र व्यसन होते. ते नियमित मद्यप्राशन करत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. दारूसाठी त्यांनी घरातील गाय विकल्याचीही माहिती समोर आली आहे. मात्र, पैशाअभावी मद्य मिळत नसल्याने नैराश्यातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. घटनेच्या वेळी त्यांची पत्नी व मुलगा शेतीच्या कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. गुलदगड घरी एकटेच राहत असल्याने ते वारंवार नशेत असत, अशी माहिती स्थानिकांनी दिली. दरम्यान, परिसरात बनावट दारूची विक्री सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, यावर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणी राहुरी पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून अकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास हवालदार सानप करत आहेत.

# कुंभमेळा विकास आराखड्यात शनिशिंगणापूरसह तीन धार्मिक स्थळांचा समावेश करण्याची शिफारस : आ. लाड



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : आगामी कुंभमेळ्यासाठी प्रस्तावित सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या विकास आराखड्यात श्री क्षेत्र शनिशिंगणापूर, श्रीक्षेत्र देवगड तसेच श्री क्षेत्र संत ज्ञानेश्वर मंदिर या जागतिक दर्जाच्या धार्मिक स्थळांचा समावेश करण्यासाठी राज्य सरकारकडे शिफारस करण्यात येणार असल्याची माहिती भाजपचे प्रवक्ते आ. प्रसाद लाड यांनी दिली. ते काल शनिशिंगणापूर येथे शनि देवाच्या दर्शनासाठी आले असता पत्रकारांशी बोलत होते.

यावेळी त्यांनी सांगितले की, या तीनही तीर्थक्षेत्रांचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे असून, कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर येणाऱ्या भाविकांसाठी आधुनिक सुविधा, पायाभूत सोयीसुविधा आणि पर्यटन विकास यांना प्राधान्य दिले जाईल. आ. लाड म्हणाले की, या परिसराचा विकास पाहता मी प्रखर हिंदुत्ववादी असल्याने हिंदू धर्मीय मंदिरासाठी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी जात असतो त्या अनुषंगाने सर्व हिंदू मंदिरे विकसित आराखडा मध्ये समावेश करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

कुंभमेळाव्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सुविधेसाठी तीनही धार्मिक मंदिर क्षेत्रांचा दर्शनाचा लाभ मिळावा म्हणून या भागाचे आ. विठ्ठलराव लंघें यांच्यासह अनेक आमदार मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यासाठी आवर्जून विशेष मुद्दा सोडवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. मला श्री देवाच्या दर्शनाने खूप समाधान वाटले. देवस्थानच्या वतीने आ. विठ्ठलराव लंघे व मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे यांनी लाड यांचा सन्मान केला.

यावेळी केशव पेशवे गडाख, सचिन देसारडा, किसान मोर्चाचे भाजपा जिल्हा अध्यक्ष अंकुश काळे, डॉ. कोलते, ड. सयाराम बानकर, सरपंच किरण जाधव, कौठा सरपंच प्रमोद गजभार, किशोर भुसारी, नामदेव येळवंडे, संदीप बानकर यांच्यासाह सरपंच, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### आम्हीच तर लंघेना शिवसेनेत पाठवले

नेवासा मतदार संघात पक्षाच्या जागा वाटपात खऱ्या अर्थाने आमदार विठ्ठल लंघे यांना भाजपकडून निवडणुकीत उतरायचे होते, परंतु काही कारणाने त्यांना शिवसेनेत पाठवावे लागल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला.

## अभिनेत्री पूजा सांवत यांचे शनिदर्शन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : नुकताच प्रसारित होणारा सालबर्डी या चित्रपटाचा शूटिंग पूर्ण झाल्यानंतर या चित्रपटातील प्रमुख अभिनेत्री पूजा सावंत यांच्यासह अनेक कलाकारांनी श्री शेत्र शनिशिंगणापूर येथे येऊन शनिचरणी चित्रपटास यश मिळो यासाठी शनी प्रार्थना करण्यात आली. नेवासा तालुकाच्या वतीने आमदार लंघें यांनी चित्रपटाचे निर्माते दिग्दर्शक कलाकार यांचे मनापासून कौतुक करून सालबर्डी टू साठी शुभेच्छा दिल्या.

आमदार लंघें म्हणाले की, या चित्रपटात कलाकार हे भूमिपुत्र व जावई भूमिपुत्र आणि ग्रामीण भागातील कलाकार असल्यामुळे अभिमान आहे,या चित्रपटात अंधश्रद्धे विरुद्ध समाजाला दिशा देऊन एक धाडसी पाऊल असून त्यामध्ये भोंदूगिरी करणाऱ्याचा शोध मुख्य अभिनय करणाऱ्या अभिनेत्री पूजा सावंत हिचा गौरव करून कौतुक केले. श्रद्धेने सर्व काही आनंद व जीवनात भरभराट होते आणि अंधश्रद्धेने अधोगतीकडे व जीवनात कुरकुर भीती निर्माण करते, याविरुद्ध या चित्रपटात सर्वच कलाकारांनी भूमिका बजावली आहे,त्यांचे मनापासून कौतुक लंघे यांनी केले.

यावेळी निर्माते अनिलजी देवडे, राम जाधव, डॉ. गजानन जाधव, दिग्दर्शक रमेश चौधरी, पूजा सावंत, भारत गणेशपुरे, शशांक शेंडे, कमलाकर सातपुते, प्रवीण डाळिंबकर, राजेंद्र सतार्डेकर यांनी चित्रपट प्रदाषणापूर्वी शनिचरणी नतमस्तक होऊन यश मिळो यासाठी प्रार्थना केली.



### जयाद्री डोंगर पेटला

सध्या वाढत्या उन्हाचा तडाखा आणि गर्मीने उच्चाँअंक गाठला असून विदर्भ मराठवाड्या सारखी परस्तिथी प्रथमच पुरंदर जयाद्री डोंगर रांगात निर्मण झाली आहे ज्वालामुखी सदृश्य दिसणारे साकुर्डे कडेपठार परिसरसतील दृश्य **(फोटो -विजयकुमार हरिश्चंद्रे )**

## अक्षय कर्डिलेंच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची २० एप्रिलला राहुरीत होणार सभा

### मंत्री पंकजा मुंडे राहणार उपस्थित

करंजी : राहुरी-पाथर्डी-नगर विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर प्रचार सभा राहुरी शहरात २० एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजता होणार असून या सभेच्या निमित्ताने पर्यटन मंत्री पंकजा मुंडे देखील उपस्थित राहणार असल्याची माहिती भाजपाचे प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या या सभेमुळे निवडणुकीच्या प्रचाराला मोठी गती मिळणार असून भाजप महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.यावेळी प्रदेश महामंत्री विजय चौधरी म्हणाले की, स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठी आणि विकासासाठी सातत्याने काम केले. त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या विविध लाभदायी योजना जनतेच्या दारापर्यंत पोहोचविण्याचे काम केले.

जनमानसात राहून काम करणाऱ्या या लोकनेत्याच्या दुःखद निधनानंतर ही पोटनिवडणूक बिनविरोध व्हायला हवी होती. मात्र विरोधकांनी या ठिकाणी घाणेरडे व द्वेषाचे राजकारण करत निवडणूक लाधली. जनतेला वेठीस धरण्याचे काम विरोधकांनी केले असून त्याचा रोष जनता मतदानातून व्यक्त करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. केंद्रात आणि राज्यात भाजपची सत्ता असून विकासकामांना गती देण्यासाठी राहुरी मतदारसंघातही भाजप महायुतीचा आमदार असणे गरजेचे आहे.

त्यामुळे जनता अक्षय कर्डिले यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचा असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या वेळी आमदार मोनिकाताई राजळे, महापौर ज्योतीताई गाडे, संपर्क मंत्री रविंद्र अनासपुरे, भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, मार्केट कमिटीचे उपसभापती रभाजी सुळ, चेअरमन दीपक लांडगे, माजी जि प सदस्य बाबा पाटील खर्से, माजी सभापती बाळासाहेब अकोलकर, मार्केट कमिटीचे संचालक वैभव खलाटे,भाजपा अध्यक्ष संतोष शिंदे, संभाजी पालवे, संचालक मंजाबापू घोरपडे, हरिभाऊ कर्डिले,भाऊसाहेब ठोंबे, धर्मनाथ आव्हाड, सचिन सातपुते,बंडू पाठक, सुरेश चव्हाण, आदी उपस्थित होते. दरम्यान, प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांनी पाथर्डी तालुक्यातील विविध गावांना भेटी देत कार्यकर्त्यांशी संवाद साधला आणि भाजप महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

# मळगंगादेवीच्या घागरीसह नेवासा शहरात पालखीची मिरवणूक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : निघोज वरून नेवासा येथे मळगंगादेवी मंदिरात आणलेल्या श्री मळगंगादेवीच्या घागरीचे व निघालेल्या पालखी मिरवणुकीचे नेवासा शहरात फटाक्यांची आतषबाजी करत उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.मळगंगादेवी मंदिराचे प्रमुख रेणुकादास उर्फ भाऊ घोलप यांनी पालखी मिरवणुकीचे नेतृत्व केले. नेवासा येथे एस टी स्टँड जवळ असलेल्या मळगंगा देवीच्या मंदिरापासून सायंकाळी ६.३० वाजता पालखी मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला.

यावेळी निघोज येथून आणलेल्या श्री मळगंगादेवीच्या घागरीची व पालखीची सुवासींनीनी पंचारती ओवाळून पूजा केली. अग्रभागी झेंडा काठी,त्यामागे बॅण्डपथक,पुष्पांनी सजविण्यात आलेली मळगंगादेवीची पालखी त्या मागे देवीच्या नावाचा जयघोष करणारे भाविक असे या पालखी मिरवणुकीचे स्वरूप होते. नेवासा शहरातील एस टी स्टँड,नगरपंचायत चौक,शहरातील मुख्य पेठेतून पालखी काढण्यात आली. या पालखीचे नेवासेकरांनी फटाक्यांची आतषबाजी करत स्वागत करून दर्शन घेतले.



नेवासा येथे मळगंगादेवी मंदिर येथे निघोजहुन आलेल्या देवीची घागर व पालखी मिरवणुकीत सहभागी झालेले भाविक दिसत आहे. **(छाया-सुधीर चव्हाण नेवासा)**

घोलप परिवाराच्या वतीने देविभक्त रेणुकादास घोलप, सुमनताई घोलप, परशुराम घोलप, लताताई घोलप, रामभाऊ घोलप, ज्योती घोलप,सचिन घोलप, जयश्री घोलप, सागर घोलप, वैशाली घोलप, शाम घोलप, ज्योती घोलप, संदीप घोलप, भारती घोलप यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले.

मळगंगादेवीच्या पालखी मिरवणुकीचा समारोप मळगंगादेवी मंदिर प्रांगणात झाल्यानंतर मळगंगा देवीच्या पालखीची संबळाच्या निनादात देवीची महाआरती करण्यात आली. महाआरतीला पालखी नेतृत्व करणारे देवीभक्त अशोक गावडे, बाळासाहेब म्हसे, जनार्धन व्यवहारे, ओम घोलप, झेंडे मिस्तरी, राजू यादव यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित भाविकांना आंबीलमहाप्रसादाचे वाटप करण्यात आले.रात्री झालेल्या देवीचा जागरण गोंधळ कार्यक्रमाला ही भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी मनाचा मोठेपणा दाखवला : प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांनी मनाचा मोठेपणा दाखवून निवडणूकीत माघार घेतली आणि अक्षय कर्डिले यांना सहकार्य केले. त्यांनी आता प्रचारासाठी समोर आले पाहिजे. अशी प्रतिपादन भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले. भाजपाच्या वतीने दि. १६ एप्रिल रोजी राहुरी शहरातील पांडुरंग लान्स येथे युवानेते अक्षय कर्डिले यांच्या विजय संकल्प सभेचे आयोजन करण्यात आले होते. रविंद्र चव्हाण पूढे म्हणाले की, केंद्र व राज्य शासना मार्फत अनेक योजना चालू आहेत. हजारो लाखो लोक या योजनांचा लाभ घेत आहेत. या सर्व योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमुळे चालू आहेत.

लाडक्या बहिणींनी ओवाळणी च्या रूपाने आपला भाऊ अक्षय कर्डिले यांना भरघोस मताने निवडून देण्याचे आवाहन चव्हाण यांनी केले. ना. राधाकृष्ण विखे म्हणाले, प्रत्येक कार्यकर्त्यांने आप आपले गाव सांभाळायचे आहे. निवडणूकीला कमी दिवस राहिले आहेत. भाजपाकडून देण्यात आलेले उमेदवार अक्षय कर्डिले यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करा. असे आवाहन राधाकृष्ण विखे यांनी केले. विधान परिषद सभापती राम शिंदे म्हणाले, शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे दुदैवाने या निवडणुकीला सामोरे जाण्याची वेळ आली. माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांनी या निवडणुकीत अर्ज भरला नाही.

मनाचा मोठेपणा दाखवल्याबद्दल भारतीय जनता पार्टी आणि महायुतीच्या माध्यमातून त्यांचे आभार व्यक्त करतो. यावेळी माजी खा. सुजय विखे यांनी प्रस्तावित भाषण करून युवानेते अक्षय कर्डिले यांना निवडून देण्याचे आवाहन केले. तर अक्षय कर्डिले यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच राहिलेले आठ दिवस माझ्यासाठी द्या. ४ तारखे नंतर मी तूमच्या कामासाठी दिवस रात्र हजर राहिल, असे आश्वासन अक्षय कर्डिले यांनी दिले. यावेळी व्यासपीठावर प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, ना. राधाकृष्ण विखे, विधान परिषद सभापती राम शिंदे, आ. विक्रम पाचपूते, आमदार प्रसाद लाड, माजी खा. सुजय विखे, युवानेते अक्षय कर्डिले, देवळाली प्रवराचे नगराध्यक्ष सत्यजित कदम, विक्रम तांबे, भैय्यासाहेब पाटील आदी उपस्थित होते.




> माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी मनाचा मोठेपणा दाखवून कर्डिले साहेबांच्या दुःखद घटनेची जाणीव ठेवून माझ्यासाठी माघार घेतली. त्यांनी भाजपामध्ये यावे आम्ही एकत्रित आल्यानंतर मतदार संघाचा न भूतो न भविष्यती असा विकास करून दाखवू.
> **अक्षय कर्डिले, युवा नेते**

# शिबलापूरात बिबट्याचा थरार

### ११ शेळ्या फस्त, अडीच लाखांचे नुकसान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील व शिर्डी विधानसभा मतदार संघातील शिबलापूर परिसरात बिबट्याने मोठा धुमाकूळ घातला आहे. शिबलापूर-आश्वी रस्त्यावरील बोंद्रे वस्ती येथे राहणाऱ्या ६२ वर्षीय वृद्ध महिला लहानबाई मच्छिंद्र वनवे यांच्या गोठ्यावर बिबट्याने मध्यरात्री भीषण हल्ला केला. या हल्ल्यात १० शेळ्या आणि १ बोकड अशा एकूण ११ प्राण्यांचा जागीच मृत्यू झाला असून, यामुळे या गरीब कुटुंबाचे सुमारे अडीच ते तीन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, लहानबाई वनवे यांनी आपल्या घरामागे १० बाय १५ आकाराच्या पत्र्याच्या गोठ्यात १० शेळ्या, १ बोकड आणि ३ छोटी कोकरे (पाठी) बांधली होती. बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास बिबट्याने गोठ्याच्या पाठीमागून असलेल्या एका अरुंद फटीतून आत प्रवेश केला. गोठा सर्व बाजूंनी बंदिस्त असल्याने बिबट्याला बाहेर पडायला जागा मिळाली नाही. शिकार करण्याच्या नादात बिबट्याने पिसाळल्यासारखा एकामागून एक सर्व १४ प्राण्यांवर हल्ला चढवला. या थरारक हल्ल्यात बिबट्याने ११ प्राण्यांच्या मानेचा घोट घेतला, तर ३ छोटी कोकरे सुदैवाने या हल्ल्यातून वाचली आहेत. हल्ल्यानंतर बिबट्याने ५ शेळ्या ओढत नेऊन जवळच ५० फुटांवर असलेल्या ऊसाच्या शेतात नेल्या. वृद्ध महिलेचे कष्ट मातीला; 'दुष्काळात तेरावा महिना' बाधित महिला लहानबाई वनवे या वयोवृद्ध असून त्यांना स्वतःची शेती नाही. शेजारी-पाजाऱ्यांकडून गवत आणि चारा आणून त्या मोठ्या कष्टाने शेळ्यांचे पालनपोषण करत होत्या.

आपला उदरनिर्वाह याच शेळ्यांवर अवलंबून असल्याने त्यांनी काटकसर करून हा गोठा जतन केला होता. सध्या बाजारात एका शेळीची किंमत २० ते २५ हजार रुपये असताना, एकाच रात्रीत अडीच ते तीन लाख रुपयांचे भांडवल बिबट्याने नष्ट केल्याने त्यांच्यावर आभाळ कोसळले आहे. दुष्काळात तेरावा महिना अशी त्यांची अवस्था झाली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच सरपंच प्रमोद बोंद्रे, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश शिंदे आणि गावातील तरुणांनी ऊसाच्या शेतात शोधमोहीम राबवली. यावेळी त्यांना ऊसात बिबट्याचा वावर असल्याचे दिसून आले. बिबट्या समोर दिसल्याने भीतीपोटी ग्रामस्थ पुन्हा घराजवळ आले. यानंतर वनपाल सुजीत बोकडे, वनकर्मचारी सूळ, गागरे आणि शेख यांना तातडीने फोनवरून माहिती देण्यात आली.

कर्मचारी घटनास्थळी पोहोचले असले, तरी वरिष्ठ वन अधिकाऱ्यांना येण्यास विलंब झाल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. एकाच रात्रीत इतक्या मोठ्या प्रमाणात शिकार झाल्याने बिबट्या याच परिसरात दबा धरून बसला असण्याची शक्यता आहे. यामुळे परिसरात भीतीचे सावट पसरले असून शेतकरी आणि ग्रामस्थ दहशतीखाली आहेत. संबंधित बिबट्याला तातडीने पिंजरा लावून जेरबंद करावे, अशी मागणी सरपंच प्रमोद बोंद्रे, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश शिंदे, दूध संस्थेचे अध्यक्ष भाऊसाहेब बोंद्रे, एकनाथ नागरे, जालिंदर बोंद्रे यांसह ग्रामस्थांनी केली आहे.